


दैनिक
# राज्य लोकतंत्र




www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१४७ | मंगळवार दि.१७ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


# कांदा निर्यातीला वेग !

## कांद्यावरील निर्यात शुल्कात कपात केल्याचा परिणाम, विदेशातून मागणी वाढली

**पुणे । प्रतिनिधी**

**किमान निर्यातमूल्याच्या बंधनातून मुक्तता आणि निर्यातशुल्क निम्म्याने कमी झाल्यामुळे घाऊक बाजारात कांद्याचे प्रतिक्विंटलचे दर ५०० रुपयांनी उंचावले. लासलगाव बाजारात चांगल्या प्रतिच्या कांद्याला सरासरी ४ हजार ७०० रुपये दर मिळाले. तर कांदा निर्यात शुल्कमध्ये कपात केल्यानंतर कांदा निर्यातीला वेग येत आहे. श्रीलंका, बांग्लादेश, गल्फ कंट्री, मलेशिया या देशातून कांद्याच्या मागणीला सुरुवात झाल्याची माहिती कांदा निर्यातदारांनी दिली आहे.**

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये कांद्याचे भाव तीन हजार रुपयांवर गेल्याने सरकारने निर्यातबंदी लागू केली होती. आता दर चार हजारांच्या पुढे असतानाही निर्बंध हटविण्यामागील समीकरणे लक्षात घेतली जात आहेत. लोकसभा निवडणुकीत कांदा उत्पादकांच्या भागात मतदानावेळी सरकारने निर्यात बंदी उठवली होती. परंतु, प्रतिमेट्रिक टन ५५० डॉलर किमान निर्यातमूल्य आणि ४० टक्के निर्यातशुल्क यामुळे निर्यातीतील अडसर कायम होते. केंद्र सरकारने किमान निर्यात मूल्याचे बंधन हटवत ४० टक्के निर्यातशुल्क २० टक्क्यांवर आणले. याचा परिणाम घाऊक बाजारावर झाला. कांदा निर्यात मूल्य आणि निर्यात शुल्कमध्ये बदल केल्यानंतर कांदा निर्यातीलाही वेग येत आहे. श्रीलंका,

पान २ वर



### शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांना अधिक लाभ होणार ?

*मे महिन्यात चाळीत साठवलेला कांदा पावसात बराचसा खराब झाला. त्यामुळे उत्पादकांकडे फारसा कांदा नाही. व्यापारी वर्गाची साठवणुकीची क्षमता अधिक आहे. त्यामुळे या निर्णयाचा लाभ शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांना अधिक होणार असल्याकडे या क्षेत्रातील जाणकारांकडून सांगितले जात आहे.*

### बांगलादेशच्या सीमेवर लाखो टन कांदा पडून

*लोकसभेत कांद्याने सरकारच्या डोळ्यात पाणी आणल्यानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्र सरकाराने किमान निर्यात मूल्य काढले. तसेच निर्यात शुल्कही ४० टक्क्यांवरून २० टक्के केले. मात्र या निर्णयानंतरही बांगलादेशच्या सीमेवर लाखो टन कांदा पडून राहीला आहे. तांत्रिक कारणामुळे सिस्टीम अपडेट झालेली नाही. त्याचा फटका व्यापाऱ्यांसह कांदा उत्पादकांना बसण्याची शक्यता आहे. बांगलादेशच्या सीमेवर कांद्याचे १०० ट्रक अडकले आहेत. याचबरोबर मुंबई पोर्टवर देखील ३०० ट्रक थांबून आहेत. तसेच नाशिकच्या जनोरी येथे निर्यातीसाठी ७० ते ८० ट्रक भरून तयार आहेत.*

## बेताल वक्तव्य करणाऱ्या आ.संजय गायकवाडांवर गुन्हा दाखल

**मुंबई । प्रतिनिधी**



आपल्या बेताल वक्तव्यांसाठी आणि बेलगाम वागण्यासाठी कुप्रसिद्ध बुलढाण्याचा आमदार संजय गायकवाड याने पुन्हा एकदा आपली लायकी आणि पातळी दाखवून देत लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्यास ११ लाखांचे बक्षीस जाहीर केले. या गुंड प्रवृत्तीच्या आमदाराच्या वक्तव्याची सरकारने गंभीर दखल घ्यावी आणि त्याच्यावर गुन्हा दाखल करून त्याच्या मुसक्या आवळाव्यात अन्यथा काँग्रेस कार्यकर्ते या गुंडांचा बंदोबस्त करतील, असा खणखणीत इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिला. या नंतर आ. गायकवाड यांच्याव गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, जननायक राहुल गांधी यांची वाढती लोकप्रियता बघून भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या पायाखालची वाळू घसरली आहे. त्यामुळे हताश आणि निराश झालेले सत्ताधारी राहुल

पान २ वर

# स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या तरूणासाठी शरद पवार सरसावले !

## मुख्यमंत्री शिंदेंना पत्र लिहित मागितली भेटीची वेळ

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील जळपास ३२ लाख परिक्षार्थी विविध स्पर्धा परिक्षांच्या माध्यमातून नोकरीच्या संधी मिळाव्यात यासाठी अहोरात्र अभ्यास करतो. मात्र या परिक्षार्थींच्या परिक्षा वेळेवर होत नाहीत, झाल्यातर त्याच्या नियुक्त्या वेळेत होत नाहीत, तसेच परिक्षाच्या तारखा प्रलंबित राहणे आदी प्रश्नी परिक्षार्थी विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण होत आहे. या असंतोषातून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहित तातडीने व्यस्त कार्यक्रमातून भेटीची वेळ देण्याची मागणी केली.**





शरद पवार यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, ऑगस्ट २०२४ मध्ये राज्य आयोगाच्या परिक्षेच्या दिवशी आयबीपीएस परिक्षा आल्याने राज्य सेवेची परिक्षा पुढे ढकलली. तसेच राज्यसेवेच्या परिक्षेत कृषीच्या २५८ जागा समाविष्ट कराव्या या मागणीसाठी परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी पुण्यात आंदोलन केले. परंतु परिक्षा पुढे ढकलत असताना परिक्षा नेमकी कधी घेण्यात येणार आहे आणि कृषी सेवेच्या जागांबाबत राज्य सेवेकडून स्पष्टीकरण येणे अपेक्षित होते. तीन आठवड्यांचा कालावधी उलटून गेला तरी परिक्षेच्या तारखांचा आणि कृषी पदांच्या समावेशाचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. त्यातच

पान २ वर

### व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढा...

राज्यातील स्पर्धा परिक्षार्थींच्या मागण्या रास्त असून यासंदर्भात आपल्याशी चर्चा करण्यासाठी वेळ मिळावा यासाठी मी गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्नशील आहे. परंतु अद्यापही वेळ मिळाला नाही. वाढत्या बेरोजगारीमुळे तरूणवर्गामध्ये प्रचंड अस्वस्थता असून प्रसंगी आंदोलनाची भूमिका घेऊनही त्यांच्या मागण्याबाबत तातडीने कार्यवाही होत नाही. तरी प्रकरणाचे गांभीर्याने स्पर्धा परिक्षा विद्यार्थ्यांच्या मांगण्यासंदर्भात व्यस्त कार्यक्रमातून वेळ मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो, असेही शरद पवार यांनी आपल्या पत्रातून मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

## फेक न्यूज पसरवून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न

### मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या विरोधात काँग्रेसची पोलिसात तक्रार

**मुंबई । प्रतिनिधी**

**कर्नाटकातील गणपती विसर्जनाबाबत फेक न्यूज पसरवून राज्यात धार्मिक तेढ निर्माण केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने केली. यासंदर्भात कुलाबा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.**

१३ सप्टेंबर रोजी बेंगलूरूच्या टाऊन हॉल परिसरात कोणतीही परवानगी न घेता विश्व हिंदू परिषदेने आंदोलन आयोजित केले. यावेळी आंदोलक गणपतीची मूर्ती घेऊन आंदोलन करत होते. आंदोलकांना ताब्यात घेताना मूर्तीला इजा होऊ नये म्हणून पोलिसांनी मूर्ती सुरक्षित ठेवली व आंदोलकांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी विधिवत पूजा अर्चना करून गणपतीबप्पाचे विसर्जन केले. ही माहिती अनेक फॅक्ट चेक करणाऱ्या वेबसाईट्स व राष्ट्रीय वृत्तवाहिन्यांनी फॅक्ट चेकच्या माध्यमातून सार्वजनिक केली आहे.

पान २ वर

## महायुतीतील धुसफूस आणखी वाढणार

### शिंदेंच्या आणखी दोघांना महामंडळे, अजित पवारांकडे एकही नाही

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणूक अगदी तोंडावर आली असताना महायुतीमध्ये पुन्हा एकदा अंतर्गत वादाची शक्यता निर्माण झाली आहे. त्याला कारण आहे महामंडळांचे वाटप. आता माजी खासदार हेमंत पाटील आणि आमदार संजय शिरसाट यांना महामंडळे देण्यात आली असून, यापूर्वी आमदार सदा सरवणकर, माजी खासदार आनंदराव अडसूळ यांचीही महामंडळावर वर्णी लागलेली आहे. शिंदेच्या शिवसेनेच्या या चौघांना महामंडळे मिळाली आहेत, मात्र अजित पवारांच्या

पान २ वर



### सुटीची सूचना

आज मंगळवार दि.१७ सप्टेंबर २०२४ रोजी अनंत चतुर्दशीनिमित्त दै.राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या बुधवार दि.१८ सप्टेंबर २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार आणि एजंट बंधूंनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

## बनावट नोटा चलनात आणणारे दोघे पकडले

### बीड शहर पथकाची कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

**शहरांमध्ये बनावट चलनी नोटा तयार होत आहे आणि त्या बाजारात आणल्या जात आहे याची शहर डीबी पथकाला मागील काही दिवसापासून माहिती होती.**

यावरून रात्री गस्त घालत असताना डीबी पथकाला माहिती मिळाली की दोन तरुण हे कागदीवेस भागामध्ये एका किराणा दुकान मध्ये बनावट चलनी नोटा खऱ्या म्हणून वापरण्यासाठी येणार आहेत. रात्री अकराच्या सुमारास अशा प्रकारचे दोन तरुण तिथे आले . त्यांची लागलीच अंग झडती घेण्यात आली आणि त्यांच्या ताब्यातून दोन हजार रुपये किमतीच्या पाच पाचशे रुपये अशी चार नोटा ताब्यात मिळाल्या. खऱ्या नोटांची त्याची जुळवणी केली असता त्या खोट्या आढळून आल्या आणि खऱ्या नोट्याच्या खुना त्यावर आढळून आल्या नाहीत. परंतु त्या बेमालूनपणे खऱ्या असल्यासारख्या दिसत होत्या. त्यांच्यावर भारतीय न्यायसंहिता कलम १७९, १८०, ३१८(४) याप्रमाणे बीड शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे. त्यातील एक आरोपी हा अल्पवयीन असून दुसऱ्या आरोपीचे नाव आकाश

पान २ वर



### अरविंद केजरीवाल आज राजीनामा देण्याची शक्यता

नवी दिल्ली। वृत्तसंस्था

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दोन दिवसांत राजीनामा देणार असल्याचे रविवारी (१५ सप्टेंबर) जाहीर केले. त्यानुसार ते मंगळवारी (१७ सप्टेंबरला) राजीनामा देण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी त्यांनी पक्षाच्या आमदारांची बैठक बोलावली आहे. दरम्यान, सोमवारी (दि.१६) अरविंद केजरीवाल आणि मनिष सिसोदिया यांच्यामध्येही एक महत्त्वाची बैठक पार पडली.

पान २ वर

## वेळेत माहिती न दिल्याने मनोहर चाळक आज करणार आत्मदहन

**बीड । प्रतिनिधी**

**स्वच्छ भारत मिशनची माहिती वेळेत न दिल्यामुळे गेवराईचे मनोहर चाळक यांनी बीड पंचायत समिती व गेवराई पंचायत समितीच्या विरोधात आत्मदहनाचा इशारा दिला असून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी मनोहर चाळक आत्मदहन करणार आहेत.**

अनेक वेळा माहिती मागूनही या दोन्ही पंचायत समितीकडून स्वच्छ भारत मिशनची माहिती देण्यास जाणीवपुर्वक टाळाटाळ केली जाते. त्यामुळे शेवटी कंटाळून त्यांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे .या संदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी मुंडे यांनी हे आत्मदहन रोखावे असे आदेश दोन्ही बिडिओंसह पोलिसांना दिले आहेत. मात्र वेळेत माहिती देण्याचा आदेश मुंडे देत नाहीत यामागचे गोडबंगाल काय? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. गेवराईचे सामाजिक कार्यकर्ते मनोहर चाळक यांनी अनेक वेळा स्वच्छ भारत मिशन मध्ये चालू असलेला सावळा गोंधळ, वैयक्तिक शौचालयातून काढली जाणारी बोगस बिले, सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम न करताच उचललेली बिले, प्रसिद्धीसाठी केलेला खर्च आदी विषयावर बीड आणि गेवराई पंचायत समितीकडे माहिती मागवली होती. मात्र ही माहिती जाणीवपूर्वक दिली जात नाही. हे अनेक वेळा स्पष्ट झाल्यानंतर मनोहर चाळक यांनी यासंदर्भात जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मुंडे यांच्याकडे आपिलाद्वारे माहिती मागवली. मात्र त्यांनी सांगूनही माहिती मिळाली नाही. स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी कर्मचारी माहिती देण्यास

पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१४ सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :१.०० क्विंटल | २,६३३ | २,६७१ | २,६५२ |
| ज्वारी/हायब्रिड : ६४.०० क्विंटल | २,०५१ | २,८११ | २,३१० |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : १६२.५० क्विंटल | ४,८०० | ७,२६० | ६,२४३ |
| बाजरी : २७.५० क्विंटल | २,३४० | ३,८७० | २,८५६ |
| मुग : २९.५० क्विंटल | ५,२०१ | ७,७०० | ७,१७९ |
| सोयाबीन:२३९.५० क्विंटल | ४,५०० | ४,७०० | ४,६५० |
| हरभरा: ६.०० क्विंटल | ६,४५० | ७,८९१ | ७,१६२ |

## ई-केवायसी न केल्यास आता रेशन होणार बंद



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

देशातील नागरिकांसाठी केंद्र सरकार अनेक योजना राबवत आहे. देशातील अनेक लोकांना सरकारी योजनांचा लाभ मिळत आहे. ज्यामध्ये बहुतांश गरीब गरजू लोकांचा समावेश आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत गरीब गरजू लोकांना अत्यंत कमी दरात रेशन मिळते. दरम्यान, आता केंद्र सरकारने शिधापत्रिका धारकांसाठी नवीन नियमावली लागू केली असून, शिधापत्रिकेची ई-केवायसी केली नाही, तर १ नोव्हेंबरपासून रेशन

पान २ वर

### हयात नसलेल्यांची नावे वगळली जाणार

रेशनकार्डवर बरीच नावे अशी आहेत, जे हयात नाहीत. त्यामुळे ती नावे वगळली जाणार आहेत. त्यामुळे आता सर्व शिधापत्रिकाधारक म्हणजेच कुटुंबाच्या शिधापत्रिकेत ज्यांची नावे नोंदलेली आहेत, या सर्वांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. त्यासाठी ते त्याच्या जवळच्या अन्न पुरवठा विभागाच्या कार्यालयात जाऊ शकतात. कोणत्याही सदस्याने ई-केवायसी न केल्यास त्याचे नाव शिधापत्रिकेतून काढून टाकले जाणार आहे.




## अग्रलेख

# पिंजऱ्यातला पोपट हा कलंक सीबीआयच्या माथी अधिक गडद!

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची १७७ दिवसांनंतर शुक्रवारी तिहार तुरुंगातून सुटका झाली. लोकसभा निवडणुकीच्या काळातील जामिनाचे दिवस वगळता १५६ दिवस ते तुरूंगात होते. सीबीआयने उत्पादन शुल्क धोरणाशी संबंधित नोंदवलेल्या गुह्यात सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांना जामीन मंजूर केला. एखाद्याला दीर्घकाळ तुरूंगात ठेवणे म्हणजे स्वातंत्र्यापासून अन्यायकारक वंचित ठेवणे होय, असे न्यायालयाने म्हटले आहे. एका पक्षाच्या प्रमुख नेत्याची सुटका करताना कोर्टाने एक प्रकारे सीबीआयला शिक्षा सुनावली आहे. ९ मे २०१३ रोजी न्यायमूर्ती आर.एम. लोढा यांच्या खंडपीठाने कोळसा घोटाळ्याच्या सुनावणीदरम्यान सीबीआय ही यंत्रणा पिंजऱ्यात बंदिस्त पोपटासारखी असून त्यांचा मालक जे सांगतो तेच ती ऐकते आणि ही एक अनैतिक कथा आहे. ज्यामध्ये पोपटाचे अनेक मालक आहेत. अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून कोळसा घोटाळ्याच्या अहवालात बदल झाले आहेत असे न्यायालयाने म्हटले होते. तेव्हा न्यायालयाने सीबीआयला सरकारचा बंदिस्त पोपट ठरवले. पण अकरा वर्षानंतर खऱ्या अर्थाने न्यायमूर्ती आर. पी. सूर्यकांत आणि न्यायमूर्ती उज्वल भुईया यांच्या खंडपीठाने त्यावर पुन्हा शिक्कामोर्तब करून एक प्रकारची शिक्षाच ठोठावली आहे.

सीबीआयने आपली पिंजऱ्यात बंदिस्त पोपटाची प्रतिमा तोडली पाहिजे असे १३ सप्टेंबर रोजी सांगून ते पिंजऱ्यात नसून मोकळे आहेत हे दाखवून द्यावे. तपास यंत्रणा प्रामाणिक असली पाहिजे. ती किंचितशीही संशयास्पद नसावी, असे म्हटले आहे. केजरीवालांना जामीन मंजूर करताना न्यायमूर्ती उज्वल भुईया यांनी अटक अन्यायकारक होती, ती केवळ सुटका रोखण्यासाठी केली, जामीन हा नियम आहे आणि तुरुंग हा अपवाद. कायद्याचा वापर कोणालाही त्रास देण्यासाठी करता येणार नाही. सीबीआयची अटक अन्यायकारक आहे. असहकाराचा अर्थ स्वत:ला दोष देणे होत नाही. जामिनाच्या अटींवर गंभीर आक्षेप आहे. दुसऱ्या न्यायालयाने यावर निर्णय दिला आहे. त्यामुळे न्यायालयीन संयम, औचित्य आणि शिस्त लक्षात घेऊन मी भाष्य करत नाही, असे म्हटले. दुसरे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी आपल्या निकालात अटक कायदेशीर आहे पण खटला सुरू असताना आरोपींना जास्त काळ तुरुंगात ठेवणे योग्य नाही. ऑगस्ट २०२२ मध्ये एफआयआर दाखल केला होता. १७ आरोपींची चौकशी बाकी आहे. खटला अद्याप पूर्ण झालेला नाही. ते जामिनाच्या अटी पूर्ण करतात. जामिनासाठी ट्रायल कोर्टात जावे हा सीबीआयचा युक्तिवाद योग्य नाही. त्यांना ईडी प्रकरणात जामीनही मिळाला आहे, कोठडीत ठेवणे अस्वीकार्य आहे. असे म्हणून सीबीआयला चपराक लगावली. या अपराधभावातून अधिकारी काही बदल घडवतील अशी अपेक्षा नाही. मात्र पिंजऱ्यातला पोपट हा कलंक मात्र त्यांच्या माथी न्यायालयाच्या या टिप्पणीनंतर अधिक गडद झाला आहे. हे सीबीआयच्या दृष्टीने अत्यंत वाईट आहे. सर्वोच्च न्यायालय वेळोवेळी जेव्हा राज्य आणि केंद्रीय तपास यंत्रणांमध्ये वाद झाला तेव्हा सीबीआयच्या बाजूने निकाल देत त्यांनी तपास सोपवला आहे. त्याच न्यायालयात असे वक्तव्य अकरा वर्षात दुसऱ्यांदा होणे ही शिक्षाच म्हटली पाहिजे.

मुख्यमंत्रीपदाच्या तिसऱ्या कालखंडात केजरीवाल यांच्यापुढे आव्हान निर्माण झाले आणि केंद्रीय सत्तेने त्यांची सीबीआय चौकशी चालवली. मद्य घोटाळा प्रकरण आणि दिल्लीचे उपराज्यपाल यांचे उपद्व्याप याबरोबरच नोकरशाहीचे न ऐकण्याचे आव्हान या सगळ्यामुळे आप गेली काही वर्षे अस्वस्थ आहे. अशा स्थितीत १५६ दिवसांच्या कैदेनंतर केजरीवाल यांची सुटका आम आदमी पक्षाचे मनोबल वाढवणारी ठरणार आहे. हरियाणाच्या निवडणुका होत असताना केजरीवाल बाहेर आले असल्याने आणि त्यांचे मूळ राज्य हरियाणा असल्याने त्याचा काही परिणाम हा केजरीवाल यांचे यश वाढण्यात होऊ शकतो. तसेच किरकोळ कारणावरून त्यांच्याशी युती तोडणाऱ्या काँग्रेसलाही त्याचा फटका बसू शकतो. केजरीवाल यांनी या परिस्थितीचा लाभ घेत आता एकदम उसळी घेतली आहे. या उपर आता आपल्या राज्यातील निवडणुका महाराष्ट्राबरोबर घ्याव्यात असे आव्हान केजरीवाल यांनी दिले आहे. एकूण काय सीबीआय आणि केंद्र सरकार यांनी केजरीवाल यांना रोखण्याचा आटोकाट प्रयत्न केला मात्र ते त्यांना शक्य झाले नाही उलट त्यांच्याच प्रतिमा मलीन झाल्या.




बीडः ईद-ए-मिलाद-उन-नबी निमीत्त आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.१६) शहरातील बालेपीर येथे रक्तदान शिबीरात उपस्थित राहून सर्व मुस्लिम बांधवांना ईद च्या शुभेच्छा दिल्या.

## घाणेवाडी तलावासाठी सहकार्य करणार-खा. कल्याण काळे

जालना । प्रतिनिधी

संत गाडगेबाबा घाणेवाडी जलाशयाच्या समृद्धीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिले घाणेवाडी जलाशयाला सोमवार दि.१६ सप्टेंबर रोजी त्यांनी भेट दिली तलावाची पहाणी करून या तलावाच्या विकासासह विविध समस्या समजून घेतल्या. यावेळी शिरपूर पॅटर्न चे जनक जलतज्ज्ञ सुरेश खानापूरकर, घाणेवाडी जलसंरक्षण मंचाचे अध्यक्ष भाईश्री रमेशभाई पटेल,जेष्ठ नेते जयप्रकाश चव्हाण, उद्योजक सुनील रायठठ्ठा,उदय शिंदे,ओमप्रकाश चितळकर उपस्थित होते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून जालना शहरासह परिसरातील बावीस गावे आणि शेतीला पाणी पुरवणारा तलाव ही आपली ऐतिहासिक धरोहर आहे आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाची ही निषाणी आहे.याचे शास्त्रशुद्ध पध्दतीनुसार जतन आणि संवर्धन करण्याचे काम लोकसहभागातून घाणेवाडी जलसंवर्धन मंचाच्या नेतृत्वाखाली चालते हा आदर्श संपूर्ण राज्यभरात घेण्याची गरज असल्याचे खा.डॉ.काळे यावेळी बोलतांना म्हणाले. घाणेवाडी तलावाचे दोन्ही सांडवे तात्काळ दुरूस्त करून तलावाच्या भिंतीवरील पिचींग दुरूस्त करण्याची गरज असल्याचे भाईश्री रमेशभाई पटेल यांनी सांगितले. लोकसहभागातून यंदाच्या वर्षांत पाच लाख ट्रॅक्टर गाळ काढून परिसरातील शेतकऱ्यांना देण्यात आल्याची माहीती उद्योजक सुनील रायठठ्ठा यांनी यावेळेस दिली घाणेवाडीतील गाळ काढून कुंडलिका नदीपात्रात मोठ्या विहिरीतून पाणी उपलब्ध झाल्यास जायकवाडी धरणातून अतिशय अल्प प्रमाणात पाणी घेण्याची जालना शहराला गरज असेल असे जलतज्ज्ञ सुरेश खानापूरकर यांनी सांगितले. जालना शहरातील विविध क्षेत्रातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी शहरातील विविध सामाजिक व सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह बैठक घेणार असल्याचे खासदार डॉ.कल्याण काळे म्हणाले.

## तणावाचा रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम-डॉ.जगदीश टेकाळे

बीडः तणावाचा आपल्या शरीरावर आणि मनावर खोलवर परिणाम होतो याचा केवळ आपल्या मानसिक आरोग्यावरच परिणाम होत नाही तर आपल्या शारीरिक आरोग्यावरही परिणाम होतो. तणावामुळे शरीरात अनेक प्रकारचे हार्मोन्स बाहेर पडतात, त्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते.



डॉक्टरांच्या मते,ताण घेतल्याने युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शनची (युटीआय) समस्या उभ्दवू शकते. युटीआय एक सामान्य समस्या आहे. जी विशेषतः महिलांमध्ये दिसून येत. तणावामुळे युटीआय ची समस्य उभ्दवू शकते. जेंव्हा आपल्याला काही आव्हान किंवा दबाव येतो तेंव्हा तणावाची समस्या उभ्दवते. कामाचा ताण, कौटुंबिक समस्या आर्थिक समस्या इत्यादी कारणांमुळे तणाव येतो. यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते.

युटीआय म्हणजे मुत्रमार्गाचा संसर्ग, हा संसर्ग बहुतेक जिवाणुंमळे होतो, जे मुत्रमार्गात प्रवेश करतात आणि संसर्ग पसरतात. यूटीआय च्या सामान्य लक्षणामध्ये लघवी करताना जळजळ होणे, लघवी करण्याची वारंवार इच्छा होणे,खालच्या ओटीपोटात दुखणे आणि लघवीला दुर्गंधी येणे याचा समावेश होतो.

तणावामुळे जेंव्हा रोग प्रतिकारक शक्ती कमकुवत होते तेंव्हा आपले शरीर संक्रमणांशी लढण्यास कमी सक्षम होते.त्यामुळे युटीआय सारखे आजार होण्याची शक्यता वाढते. तणावामुळे शरीरात काही हार्मोन्सची पातळी वाढते. ज्यामुळे मुत्रमार्गाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.

तणाव कमी करण्यासाठी योग्?,ध्यान आणि नियमित व्यायाम करावा तसेच दिवसभर पुरेसे पाणी प्यावे, जेणेकरुन विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढता येतील असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस.,एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

## जालन्यात शुक्रवारपासून राज्यस्तरीय कृषी महोत्सव-आ.कैलास गोरंट्याल

जालना । प्रतिनिधी

जालना येथे येत्या २० सप्टेंबर शुक्रवारपासून तीन दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी बांधवांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख होऊन उत्पादन वाढीसाठी नेमक्या कोणत्या तंत्राचा वापर केला पाहीजे हा या महोत्सव आयोजना मागील उद्देश असल्याची माहीती कृषी महोत्सवाचे मुख्य संयोजक आ.कैलास गोरंट्याल यांनी दिली. शहरातील फ्रेजर बॉईज हायस्कुलच्या मैदानात आयोजित करण्यात आलेल्या या कृषी महोत्सवाचे उदघाटन दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांच्याहस्ते करण्यात येणार असून अध्यक्षस्थानी विधान सभेतील विरोधी पक्षनेते विजयी वडेट्टीवार हे राहणार आहेत. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, खा. डॉ. कल्याण काळे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पा.दानवे यांची या महोत्सवास विशेष उपस्थिती राहणार आहे. माजी मंत्री आ. राजेश टोपे, आ. बबनराव लोणीकर, आ. राजेश राठोड, आ. संतोष दानवे, आ. नारायण कुचे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी म.रा.कापसे, महीको सिडसचे रितेश मिश्रा, कलश सिडसचे समीर अग्रवाल, कृषी तज्ञ विजयअण्णा बोराडे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना उबाठा पक्षाचे



जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.निसार देशमुख यांची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थिती राहणार आहे. दरम्यान, या तीन दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या निमित्ताने परिसंवाद, चर्चासत्र आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले असून परिसंवाद व चर्चासत्रांच्या माध्यमातून शेतकर्यांना तंज्ञाचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्यात शुक्रवार दि. २० सप्टेंबर रोजी म्हणजेच पहील्या दिवशी सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत महाराष्ट्राची लोकधारा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २१ सप्टेबर रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत सेंद्रीय शेती , नैसर्गिक शेती या विषयावर खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्रातील विषय तज्ञ डॉ. राहुल चौधरी हे उपस्थित शेतकर्यांना मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी १२ ते १ या वेळेत सोयाबीन, तुर लागवड तंत्रज्ञान या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील कृषी विस्तार विद्यावेता डॉ. सुर्यकांत पवार हे मार्गदर्शन करणार असून सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत शालेय विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन, गायन, नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि. २२ सप्टेंबर रविवार रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत कृषी अन्न प्रक्रिया उद्योग व विक्री व्यवस्थापन या विषयावर जालना जिजामाता कृषीभुषण पुरस्कार प्राप्त उद्योजिका सौ.सिताबाई मोहीते या मार्गदर्शन करणार असून दुपारी १२ ते १ या वेळेत सिताफळ लागवड तंत्रज्ञान या विषयावर जाफराबाद तालुक्यातील नळविहीरा येथील अॅग्रो व्हिजन गट शेती संघाचे अध्यक्ष संजय मोरे हे मार्गदर्शन करणार असून सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि. २३ सप्टेबर सोमवारी दुपारी ३ ते ४ या वेळेत मोसंबी तंत्रज्ञान या विषयावर बदनापूर येथील मोसंबी संशोधन केंद्रातील डॉ. संजय पाटील सोयगावकर हे मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी ४ ते ५ या वेळेत महिला सक्षमीकरण या विषयावर सौ. योगिताताई खांडेभराड या महिलांना मार्गदर्शन करणार आहेत तर सायंकाळी ५ ते ९ या वेळेत महाराष्ट्राची लोककला या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जालन्यासह मराठवाड्यातील शेतकरी बांधवांनी या तीन दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवास उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन कृषी महोत्सवाचे मुख्य संयोजक आ. कैलास गोरंट्याल यांनी केले आहे.

## सहाय्यक सरकारी अभियोक्ता पॅनल उच्च न्यायालय आदेशा प्रमाणे कार्यवाही करा-शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**

**मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे न्यायालयातील प्रलंबित रिट याचीकेमध्ये आदेश असल्यामुळे सी.आर.पी.सी. चे कलम २५ (३) व बी.एन.एस.एस. चे कलम १९ (३) अन्वये विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे नविन पॅनल तयार करण्यात येवु नये व जाहिरात प्रसिद्ध करण्यात येवु नये असे तक्रार जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व शेख निजाम शिवसेना शहर प्रमुख बीड यांनी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन दिले जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत आपण जुनी सी.आर.सी. चे कलम २५ (३) व नविन बी.एन.एस.एस. चे कलम १९ (३) अन्वये बीड जिल्ह्यामध्ये न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयात कामकाज करणे कामी विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे नविन पॅनल तयार करण्याचे तयारीअसल्याचे समजले आहे.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व शहरप्रमुख शेख निजाम यांच्या प्रमुख उपस्थित अनेक वकीला सोबत शिष्टमंडळाने मा. जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे न्यायालयात सी.आर.पी.सी.चे कलम २५(३) नुसार नियुक्त करण्यात आलेले जुने पॅनल संबंधी रिट याचीका क्र.३८८४/ २०१६, १२६२/ २०१४, १२७१८/२०२४, ३३८४/२०१६, ९९९८/२०१७, ९८५०/२०१७, १३२७४/ २०१८, ३७२८/२०१८, ३०८४/२०१६, ३१३३/२०१६ इत्यादी रिट याचीका प्रलंबीत आहेत.**

रिट याचीका क्र. ३०८४/२०१६ व ३१३३/२०१६ या दोन रिट याचीकेमध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे न्यायालयातील न्यायमुर्ती आर. एम. बोर्डे व पी.आर.बोरा साहेब यांचे न्यायालयाने दिनांक १६/०३/२०१६ रोजी मा. जिल्हाधिकारी यांनी सी.आर.पी.सी. चे कलम २५ (३) प्रमाणे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची केलेली नेमणुक कायदेशिरदृष्ट्या योग्य नसल्याचे व सदर नियुक्तीला कोणताही कायदेशिर आधार नसल्याचे आदेशामध्ये नमुद केले आहे. त्याच प्रमाणे रिट याचीका क्र. ३८८४/२०१६, १२६२/२०१४, १२७१/२०२१, ३३८४/ २०१६, ९९९८/ २०१७, ९८५०/२०१७, १३२७४/ २०१८, १३७२८/२०१८, मध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद न्यायमुर्ती रविंद्र व्ही. घुगे व आर.एन. जोशी साहेब यांचे न्यायालयाने दिनांक ०२/०४/२०२४ रोजी त्यांचे आदेशामध्ये देखील जिल्हाधिकारी यांनी सी.आर.पी.सी. चे कलम २५ (३) प्रमाणे नियुक्त केलेले विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणुक देखील कायदेशीर तरतुदीप्रमाणे कायद्यात बसत नसल्याचे मत व्यक्त करून तसे आदेशामध्ये नमुद केले आहे. असे असतांना आपण जुनी सी.आर.पी.सी. चे कलम २५ (३) व नविन बी.एन.एस.एस. चे कलम १९ (३) प्रमाणे तालुका न्यायालयातील व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात शासना मार्फत खटला चालविण्याकामी विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे नविन पॅनल तयार करण्याची तयारी सुरू आहे जिल्हाधिकारी बीड यांनी नविन पॅनल तयार करू नये व त्यासंबंधिची जाहिरात प्रसिद्ध करू नये नसता आपण तसे करण्याचा प्रयत्न केल्यास तो मा. उच्च न्यायालयाचा अपमान होईल. त्यामुळे आपण त्यासंबंधी सहाय्य करावे व कायदेशिर प्रक्रियेचे पालन करावे असे जिल्हाधिकारी बीड यांना परमेश्वर सातपुते व शेख निजाम , शिवसेना शहर प्रमुख बीड, यांनी तक्रारी अर्ज दाखल केला आहे.



## पान १वरून...

### कांदा निर्यातीला

बांग्लादेश,गल्फ कंट्री, मलेशिया या देशातून कांद्याच्या मागणीला सुरवात झाल्याचे कांदा निर्यातदारांनी म्हटल्याने कांद्याचे दर आणखीन वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे कांदा उत्पादकांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

--------

### स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या

ऑक्टोंबर महिन्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता असून, यासंदर्भात त्वरित निर्णय घेण्यात यावा अशी मागणी त्यांनी केली. पत्रात शरद पवार म्हणाले की, दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात आयोजित गट ब आणि गट क पदाच्या परिक्षेबाबत अद्यापही ठोस प्रक्रिया करण्यात आलेली नाही. तसेच आचारसंहिता लागू होण्यापूर्वी सदरील परिक्षेची जाहिरात प्रसिध्द होणे गरजेचे आहे आणि आवश्यक पदांच्या संख्येत वाढ करणे अपेक्षित असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले आहे. त्याचबरोबर शरद पवार आपल्या पत्रात म्हणाले की, राज्य कृषी सेवा, पोलिस उपनिरिक्षक, विक्रीकर सहाय्यक, वैगेरे सरळ सेवेतील अनेक पदांवर निवड होऊन बराच कालावधी झालेल्या उमेदवारांना अद्याप नियुक्त्या मिळालेल्या नाहीत. तरी रखडलेल्या नियुक्त्या करण्याचे आदेश त्वरीत देण्यात यावे अशी मागणीही त्यांनी केली. याशिवाय लिपिक पदाकरिता ७ हजारहून अधिक जागांची भरती यासह अन्य काही भरतीप्रक्रिया न्यायालयीन प्रकरणात अडकलेल्या आहेत. त्यावर त्वरीत निर्णय घ्यावा, तसेच राज्यातील प्राध्यापकांच्या जागाही रिक्त आहेत. त्या रिक्त जागांचा नव्याने आढावा घेऊन शिक्षक भरती आणि प्राध्यापक भरतीला गती द्यावी अशी मागणी केली.

-----------

### महायुतीतील धुसफूस

वाट्याला अद्याप एकही महामंडळ मिळालेले नाही. यामुळे अगोदरच जागा वाटपावरून महायुतीती सुरू असलेले रूसवेफुगवे आता अधिक वाढण्याची शक्यता आहे. शिंदे गटाचे आमदार सदा सरवणकर सिद्धिविनायक न्यासाचे ट्रस्टी, माजी खासदार हेमंत पाटील हळद संशोधन केंद्राचे प्रमुख, माजी खासदार आनंदराव अडसूळ यांना महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्षपद, तर आमदार संजय शिरसाट यांची सिडको महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. हे सर्वजण शिंदे गटाचे नेते आहेत. त्यामध्ये भाजप वा अजित पवारांच्या एकाही नेत्याला महामंडळपदी संधी मिळाली नसल्याने याची जोरदार चर्चा सुरू आहे. यावर अजित पवारांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली. महायुतीमध्ये राष्ट्रवादीचा योग्य सन्मान होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला देखील महामंडळ येणार असल्याची माहिती सुनील तटकरे यांची दिली.

-----------

### फेक न्यूज पसरवून धार्मिक तेढ

पण राजकीय फायद्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या संदर्भात माध्यमांना प्रतिक्रिया देताना कर्नाटक सरकारने व पोलिसांनी गणपती उत्सव थांबवून गणपतीची मूर्ती जप्त केली असे धडधडीत असत्य विधान करून सणासुदीच्या काळात राज्यात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यासोबतच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आपल्या एक्स (ट्विटर) हँडलवरून या संदर्भात चुकीची माहिती प्रसारित करून कर्नाटकच्या काँग्रेसला जबाबदार धरले. तर भाजपाचे आमदार नितेश राणे यांनी या संदर्भात खोटी माहिती प्रसारित करून समाजात तेढ आणि धार्मिक तणाव निर्माण करण्याचा व सामाजिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई अशी मागणी करणारी लेखी तक्रार प्रदेश काँग्रेसच्या विधि विभागाचे अध्यक्ष अॅड. रविप्रकाश जाधव यांनी कुलाबा पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरिक्षकाकडे केली. निवडणुकीच्या तोंडावर राजकीय फायद्यासाठी सत्ताधारी पक्षाचे नेत्यांकडून सातत्याने फेक न्यूज आणि अफवा पसरवून राज्यात धार्मिक आणि जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांचे हे कृत्य सामाजिक शांतता भंग करणारे आहे. पोलिसांनी यांची गंभीर दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाने केली.

----------

### वेळेत माहिती न दिल्याने मनोहर

टाळाटाळ करत असल्याने त्यांनी बीड आणि गेवराई पंचायत समितीच्या विरोधात चाळक यांनी आत्मदान करण्याचा इशारा दिला आहे. मराठवाडा मुक्ती दिनी ते आत्मदहन करणार आहेत. स्वच्छ भारत मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मुंडे यांनी बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि गेवराई पंचायत समितीचे गट विकास अधिकारी तसेच पोलीस यंत्रणेला हे आत्मदहन रोखण्यासाठी पत्र दिले आहे.

-----------

### अरविंद केजरीवाल आज

या वेळी मुख्यमंत्रीपदी कोण, यावर चर्चा झाल्याचे समजते. आम आदमी पक्षाच्या आमदारांची बैठक मंगळवारी (१७ सप्टेंबर) होणार आहे. या बैठकीमध्ये मुख्यमंत्री कोण होणार यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. यामध्ये प्रामुख्याने अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल, दिल्ली सरकारमधील वरिष्ठ मंत्री अतिशी, मंत्री कैलास गेहलोत, मंत्री गोपाल राय, मंत्री सौरभ भारद्वाज अशा नावांची चर्चा आहे. मात्र अरविंद केजरीवाल महिला नेतृत्वाला संधी देतील, अशी शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त केली जात आहे. हरियाणा राज्यातील विधानसभा निवडणूक लक्षात घेऊनही मुख्यमंत्री पदावर डाव खेळला जाऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

--------

### बनावट नोटा चलनात

रमेश जाधव असे आहे. आरोपीमधील आकाश रमेश जाधव यास पाच दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली असून, नोटा कुठे छापत असे, कोणती मशीन वापरत असे, आणखी कोण कोण आरोपी याच्यामध्ये सहभागी आहे, याबाबतची माहिती यातील अटक आरोपीने दिली आहे. लवकरच बनावट नोटांची मशीन जप्त करून यातील सर्व आरोपी अटक करण्यात येतील अशी माहिती अशी माहिती शितल कुमार बल्लाळ पोलीस निरीक्षक बीड शहर यांनी दिली आहे. सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी विश्वंभर गोलडे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शितलकुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस उपनिरीक्षक महादेव का महादेव महादेव टिपरसे पोलीस अमलदार पोलीस अंमलदार बाळासाहेब शिरसाट सय्यद शहेनशहा सय्यद अशपाक जयसिंग वायकर मनोज परजणे सुषेन पवार, सचिन अलगट यांनी केली आहे.

--------------------

### ई-केवायसी न केल्यास आता

बंद होणार आहे. कमी किमतीच्या रेशन योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांकडे शिधापत्रिका असणे खूप आवश्यक आहे. आता सरकारने शिधापत्रिकाधारकांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार १ नोव्हेंबरपासून रेशन बंद होणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत सर्व शिधापत्रिकाधारकांनी ई-केवायसी करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती अन्न आणि सार्वजनिक मंत्रालयाने यापूर्वीच जारी केली होती. मात्र अनेक शिधापत्रिकाधारकांची अवस्था अशीच आहे. ज्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यांचे रेशन १ नोव्हेंबरपासून बंद होणार आहे. विभागाने दिलेल्या माहितीनुसार ई-केवायसीसाठी ३१ ऑक्टोबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. शिधापत्रिकाधारकाने ३१ ऑक्टोबरपर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्याला पुढचा महिना रेशन मिळणार नाही. अशा शिधापत्रिकाधारकांची नावेही शिधापत्रिकेतून वगळण्यात येणार आहेत. ई-केवायसी नसलेल्या शिधापत्रिका रद्द केल्या जातील. यानंतर या लोकांना सरकारच्या रेशन योजनेचा लाभ मिळणार नाही, असे स्पष्ट सूचित करण्यात आले आहे.

---------

### बेताल वक्तव्य करणाऱ्या आ.संजय

गांधीच्या वक्तव्याची मोडतोड करून, विपर्यास करून त्यांच्या बदनामीची मोहिम चालवत आहेत. राहुल गांधी यांनी कधीही आरक्षण बंद करू असे म्हटले नाही. उलट आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवून ज्या समाजाचे आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित आहेत ते सोडवू असे म्हटले आहे. पण भारतीय जनता पक्ष आणि त्यांची पिलावळ सातत्याने अफवा पसरवून फेक नॅरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांचे गुंड प्रवृत्तीचे लोक तर त्यापुढे जाऊन जीवे मारण्याच्या धमक्या देत आहेत. सरकार या गुंडावर काहीच कारवाई करत नाही, त्यामुळे देशात कायद्याचे राज्य आहे की भाजपाच्या गुंडांचे ? असा प्रश्न जनतेला पडला आहे. शेवटी बोलताना नाना पटोले म्हणाले की, संजय गायकवाड सारख्या अडाणी लोकांना राहुल गांधी अमेरिकेत काय बोलले ते माहित तरी आहे का? राहुल गांधी मोदी, शाह यांना घाबरत नाहीत. संजय गायकवाड सारख्या गावगुंडांच्या धमक्यांना ते थोडेच घाबरणार आहेत. आमच्यासारखे महाराष्ट्रासह देशभरातील कोट्यवधी काँग्रेस कार्यकर्ते ढाल बनून त्यांचे संरक्षण करायला सज्ज आहेत. त्यांच्या केसाला धक्का लावायचा प्रयत्न सोडा विचारही करू नका असा इशाराही यावेळी त्यांनी दिला. दबाव वाढल्यानंतर आ.संजय गायकवांड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**आ.गायकवाडांकडून आता गाडण्याची भाषा**

आपल्या बेताल वक्तव्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीवर चिखल उडवणाऱ्या शिंदेंच्या शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाडांची जीभ पुन्हा एकदा घसरली आहे. राहुल गांधींची जीभ छाटण्याची भाषा करणारे संजय गायकवाड आता काँग्रेसच्या नेत्यांना गाडण्याची भाषा करत आहेत. संजय गायकवाड म्हणाले, १९ सप्टेंबरला मुख्यमंत्री बुलढाणा येथे येत आहेत. यावेळी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम होणार आहे. माझ्या कार्यक्रमात जर कुणी काँग्रेसच्या कुत्र्याने अडथळा आणला तर त्याला तिथेच गाडून टाकीन. त्यांनी फक्त आमच्या रोडवर पाय ठेऊन दाखवावा. जर पाय ठेवला तर तुम्हाला कळेल शिवसेना काय आहे, असे आ.गायकवाड म्हणाले.

-------------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४



## ग्रामीणचे सेवा केंद्र अंबड तहसील कार्यालयासमोर तहसीलदार बंद करणार का?

अंबड । प्रतिनिधी

महा-ई-सेवा आयडी केंद्र अंबड मध्ये ग्रामीण भागातील १८ केंद्र सुरू असल्याची माहिती जिल्हा समवयक यांनी दिली आहे परंतु कारवाई करण्याचे अधिकार अंबड तहसीलदार यांना आहे असे बोलल्या जात आहे परंतु ग्रामीण भागातील महा सेवा आयडी अंबड तहसीलदारांच्या आशीर्वादाने ग्रामीण भागातील सीएससी केंद्र शहरांमध्ये सुरू असल्याचे दिसून येत आहे याप्रकरणी जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांनी तात्काळ कारवाई करण्यासंदर्भात आदेश देण्यात यावी व यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची गैरस होणार नाही याचा विचार करून कारवाई करणे अपेक्षित आहे.अशी मागणी सर्वसामान्य नागरिक कडून केल्या जात आहे. या संदर्भात प्रल्हाद तारक यांना विचारले असता ते म्हणाले की ग्रामीण भागातील असलेले अंबड शहरांमध्ये महा ई सेवा आयडी केंद्र चालकांना नोटीस दिलेले आहे . परंतु ही कारवाई अंबड तहसीलदार यांनी करावे अशी मागणी होत आहे. कारवाई करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी गेली एक महिन्यापूर्वी जिल्हा माहिती कार्यालय मार्फत एक प्रेस नोट काढण्यात आली होती.तसेच या प्रकरणी अंबड शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील महा इ सेवा केंद्र असल्याचे माहिती श्री तारक यांनी दिली आहे ते म्हणाले की ग्रामीण भागातील सेवा केंद्र अंबड शहरात १८ सुरू आहे त्यांना नोटिसा देण्यात आल्या आहे परंतु यामध्ये सुधारणा होत नाही म्हणून जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून कारवाई करून जे ग्रामीण भागातील सेवा केंद्र शहरात सुरू आहे ते रद्द करण्यात येणार आहे अशी माहिती प्रल्हाद तारक यांनी दिली होती

# मी साहित्यिक असल्याने चेहरा पाहून माणसांच्या व्यथा वाचायला मला चांगल जमत -ना.धनंजय मुंडे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई ही सांकृति, साहित्य जोपासणारी नगरी असून या ठिकाणी माझी जडणघडण झाली म्हणून मी स्वतः ला भाग्यवान समजते. सुदर्शन रापतवार यांनी पत ठेवली आहे ती पत्रकारितेची व त्यामुळेच त्यांनी आपल्या तीन पुस्तकातून विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे असे उदगार जेष्ठ साहित्यिक डॉ वृषाली किन्हाळकर यांनी काढले तर मी ही एक साहित्यिक असून चेहरा पाहून माणसाच्या व्यथा वाचायला मला चांगलं जमत असे उदगार ना धनंजय मुंडे यांनी काढले. सजग पत्रकार सुदर्शन रापतवार यांच्या लेखणीतुन साकारलेल्या असामान्य, मंदिराचे गांव, सहज सुचलं म्हणून या साहित्याचा प्रकाशन सोहळा डॉ वृषाली किन्हाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी कृषी मंत्री मा ना धनंजय मुंडे खा. रजनी ताई पाटील, आ नमितातार्इ मुंदडा, माजी नगराध्यक्ष राजकिशोर पापा मोदी आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी बोलताना वृषाली किन्हाळकर पुढे म्हणाल्या की, तीन बाळ जन्मायची असल्याने माझ्या सारख्या स्त्री रोग तज्ञाला कार्यक्रमाला बोलावला. आजही या गावात उत्तम माणुसकी आहे. रापतवाराने पत ठेवली आहे ती पत्रकारितेची. अंबाजोगाई चा सांस्कृतिक वारसा जोपासण्याचा रापतवाराचा सिहांचा वाटा असनार आहे. प्रत्येका जवळ एक गुण असतो. तो त्यांच्यात आहे. अंबाजोगाईचं वैभव लोहिया दाम्पत्य, अमर हबीब, दगडू लोमटे सारख्या व्यक्ती असून यांच्या सहवासामुळे स्वा रा ती वैद्यकीय महाविद्यालयामध्ये शिक्षण शिकल्यामुळे आम्ही भाग्यवान आहोत. रापतवार यांची भाषा मवाळ आहे. असामान्य हे पुस्तक त्यांचं मेनुकार्ड आहे त्यांना



सुदर्शन रापतवार यांनी पत्रकारितेची पत ठेवल्यामुळे आपल्या ३ पुस्तकातून विविध पैलूंवर प्रकाश टाकला -डॉ.वृषाली किन्हाळकर

ग्रंथ लिहायचा आहे. समाजाची नाडी तपासणारा डॉक्टर आहे. असामान्य पुस्तकात २७ व्यक्तिरेखा अधोरेखित केल्या आहेत.

मी शिकत असताना आद्यकवी मुकुंदराज समाधीकडून येणार वार माझ्या खिडकी मधून आत यायचं त्या मुळे मी कविता शिकले. आपल्या गावचे देणे काय आहे हे त्यांच्या कडून शिकावं. सहज सुचलं म्हणून या तीन शब्दातून रापतवार यांच्या साहित्याची ओळख देते. या वेळी बोलताना ना धनंजय मुंडे म्हणाले की, आंबा नगरी साहित्याची नगरी आहे. ग्रंथ संपदा जोपासणारी नगरी आहे. मी ही साहित्य वेढा आहे, चेहरा पाहून व्यथा वाचायच मला समजतंय. अंबाजोगाई नगरीने अनेक जेष्ठ पत्रकार दिले आहेत. आज डिजिटल मिडीयाला बुड ना शेंडा आहे. अशाही परिस्थिती मध्ये रापतवार हे ३ पुस्तक प्रकाशित करत आहेत ही अभिमानाची गोष्ट आहे. या वेळी खा रजनीताई पाटील म्हणाल्या की, मला पुण्याची उणीव अंबाजोगाई मध्ये वाटली नाही. मराठी भाषेला अभिजित भाशेचा दर्जा मिळावा या साठी माझे प्रयत्न आहेत.असामान्य पुस्तकात तळा गाळातील व्यक्तिमत्वाला स्थान दिल्या गेलं आहे.

अंबाजोगाई मध्ये मला रत्ना सारखी माणस मिळाली. सर्वांच्या स्फूर्तीचे केंद्र अंबाजोगाई आहे. या वेळी बोलताना आ नमिता ताई मुंदडा म्हणाल्या की, ४० वर्षात रापतवार यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. अंबाजोगाई मध्ये वेगळी ओळख निर्माण केलेल्या असंख्य व्यक्ती आहेत. अंबाजोगाईचा एतिहासिक वारसा जोपासन्याचा प्रयत्न मंदिराच गांव या माध्यमातून केला आहे. या वेळी बोलताना राजकिशोर मोदी म्हणाले की, आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न या पुस्तकाच्या माध्यमातून रापतवार यानी केला असून नवीन पिढीला हे मार्गदर्शक ठरणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुदर्शन रापतवार यांनी केले. या प्रसंगी अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे, दत्ता आबा पाटील, अनिकेत लोहिया, डॉ वंगे, राजेसाहेब देशमुख, राजेश्वर चव्हाण, राजाभाऊ औताडे, हनुमंत मोरे, प्राचार्य बाबासाहेब ठोंबरे, उद्धव बापू आपेगावकर, दिलीप सांगळे, एस बी सय्यद, अमर हबीब, दगडू लोमटे, ऍड अनंतराव जगतकर, मनोज लखेरा, गोविंद देशमुख, यांच्या सह असंख्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अभिजित जोंधळे तर आभार विजय रापतवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी बळीराम उपाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी संगीत रजनीच्या माध्यमातून सर्वांचे मनोरंजन केले.

## आज खोलेश्वर महाविद्यालयात सर्वंकष रक्त तपासणी शिबिराचे आयोजन

अंबाजोगाई प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्राम दिन तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्म त्रिशताब्दी वर्ष यांचे औचित्य साधून येथील खोलेश्वर महाविद्यालयाच्या आरोग्य सुविधा केंद्राच्या वतीने सर्व नागरिकांसाठी सर्वंकष रक्त तपासणी शिबिराचे आयोजन दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. आजच्या धावपळीच्या युगात प्रत्येकाला आपल्या आरोग्याकडे पुरेसा वेळ देणे शक्य होत नाही. बदलते जीवनमान पद्धती व आजारांचे स्वरूप लक्षात घेता आपल्या आरोग्याची काळजी आपणच घेतली पाहिजे,त्यासाठी नियमितपणे तपासण्या केल्या पाहिजेत. विशेषतः ज्या व्यक्ती ३५ वर्षांवरील आहेत त्यांनी तर विविध प्रकारच्या चाचण्या या नियमितपणे केल्या पाहिजेत जेणेकरून वेळेच्या आत एखाद्या विशिष्ट रोगाचे निदान होईल व त्यावर वेळेत उपचार करता येतील. या शिबिरामध्ये लिपीड प्रोफाइल, किडनी प्रोफाइल, लिव्हर प्रोफाइल, थायरॉईड प्रोफाइल, जीवनसत्वांची कमतरता, रक्तातील लोहाचे प्रमाण, रक्तातील शर्करेचे प्रमाण, हिमोग्राम इत्यादी विविध घटकांची तपासणी केली जाणार आहे. नागरिकांनी आपला रक्त नमुना तपासणीसाठी देण्यापूर्वी किमान १२ तास उपाशी राहणे आवश्यक आहे. चहा, कॉफी देखील घेऊ नये. शिबिराची वेळ सकाळी सात ते ११ अशी राहणार आहे. सर्व तपासण्या सर्व नागरिक, कर्मचारी यांच्यासाठी अत्यल्प दरात ठेवण्यात आलेल्या असून याचा लाभ शहर व परिसरातील सर्व नागरिक, कर्मचारी, विद्यार्थी यांनी घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष श्री. रामभाऊ कुलकर्णी, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.रवींद्र कुंबेफळकर, पर्यवेक्षक प्रा. योगेश कुलकर्णी आरोग्य सुविधा केंद्रप्रमुख प्रा.डॉ. तात्या पुरी, सदस्य प्रा.सौ.अनिता बर्दापूरकर यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी खालील दिलेल्या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा. प्रा. डॉ. तात्या पुरी(९९६०७४७१८५) प्रा.डॉ.रवींद्र कुंबेफळकर (८६६८८३७७१७), प्रा. सौ. अनिता बर्दापूरकर (९७६३६३६३०८), प्रा.योगेश कुलकर्णी (९४०३०३७०११), श्री सचिन गौरशेटे( ९६०४५३६७५९)

## ज्ञान,परीश्रम,जिद्द,सातत्य व चिकाटीद्वारे कोणत्याही क्षेत्रात यश मिळते -अतिरिक्त आयुक्त भारत राठोड

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परिस्थिती कितीही बिकट असली तरीही ज्ञान, परीश्रम, जिद्द, सातत्य व चिकाटीद्वारे कोणत्याही क्षेत्रात हमखास यश मिळते असे प्रतिपादन परळी नगरीचे सुपूत्र सध्या पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त असलेले श्री.भारत राठोड यांनी श्री.केदारी महाराज विद्या मंदीर,नंदनज शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेतील मार्गदर्शन करताना व्यक्त केले.या शाळेच्या मुख्याध्यापकपदी पदोन्तीने शैक्षणिक,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर तसेच विविध क्षेत्रात नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणारे शिक्षक श्री.चेतन सौंदळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल श्री.वैद्यनाथ विद्यालय ८९ बॅचच्या वर्गमित्रांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी परळी तालुक्याचे क्रिडा समन्वयक श्री.संजय(पापा) देशमुख सरांनी मनोगत व्यक्त करताना बीड जिल्हयातील ग्रामीण भागातील विद्यार्थी ऑलम्पिक,आशिया, राष्ट्रीय व राज्य स्पर्धेत क्रिडा क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करत असून क्रिडा क्षेत्रात परळी तालुक्यातून अधिकाधिक विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगीतले.

याप्रसंगी ह.भ.प.ॲड दत्ता महाराज आंधळे यांनी मनोगत केले तसेच सत्काराला उत्तर देताना नवनिर्वाचित मुख्याध्यापक श्री.चेतन सौंदळे यांनी सर्व क्षेत्रातील नामवंत,शिक्षण क्षेत्रातील अधिकारी,मुख्याध्यापक व गुरूजन तसेच पालकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबत शैक्षणिक गुणवत्तावाढीसह भविष्यातील स्पर्धेत यशस्वी होणारा विद्यार्थी घडविण्याचा कर्तव्यातून प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली.

यावेळी वैद्यनाथ विद्यालय -८९ बॅचचे एकनाथ सावजी,ॲड.रमेश साखरे,शिवाजी म्हाळगी,रमाकांत रेवडकर,नरहरी आसेवार,प्रदीप श्रीनिवार,उपेन्द्र धुमाळ,सुशेन दहीफळे,संतोष नावंदर,शिरीष सावजी,अभय लोणीकर,शैलेन्द्र आरविकर,हनुमंत गित्ते,प्रदीप धुमाळ यांची उपस्थिती होती.

शाळेतील शिक्षक श्री.अनिल आदुडे यांनी सुत्रसंचलन केले तर प्रास्ताविक श्री.रामदास नागरगोजे व आभार श्री.गुलाब कदम सर यांनी व्यक्त केले तसेच श्री.एल.पी.फड सर,श्री.मोतीराम पवार सर,श्री.सुरेश तांदळे सर,श्री.गवळी सर,रामेश्वर कस्तुरे सर व दत्ता लोखंडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले.

# मतदारांच्या संपर्क दौऱ्या अंतर्गत इंजि एन डी शिंदे यांनी १०० गावातील मतदारांशी केला थेट संवाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विधानसभेचा कार्यकाळ संपत येऊन निवडणूकीचे दिवस जसजसे जवळ येऊ लागले आहेत तसेच विधानसभा निवडणूक लढवू इच्छिणारे संभाव्य उमेदवार देखील गावोगावी प्रत्यक्ष मतदारात मिसळताना दिसून येत आहेत. बीड जिल्ह्यातील केज विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवू इच्छिणारे संभाव्य उमेदवार इंजि एन डी( नवनाथ) शिंदे यांनी देखील केज मतदार संघातील १०० गावातील मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेण्याचा प्रयत्न केला आहे. गेलेल्या १०० गावातील नागरिकांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून इंजि एन डी शिंदे हे भारावून जात भावूक झाले होते.

केज मतदार संघासाठीची विधानसभा लढवू इच्छिणारे इंजि नवनाथ शिंदे (एन



डी) यांनी केज मतदार संघातील १०० गावे संपर्कित केले आहेत. या संपर्कातून मतदारांमध्ये त्यांच्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण केले आहे. शिंदे यांनी केज मतदारसंघात असलेल्या अंबाजोगाई, केज व नेकनूर भागातील विविध जिल्हा परिषद सर्कल पिंजून काढत तेथील गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तथा तेथील प्रतिष्ठित नागरिक त्यासोबतच तेथील युवक तथा महिला ग्रामस्थांच्या समोरासमोर प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. आपल्या संभाव्य उमेदवारीची माहिती त्या त्या ठिकाणच्या ग्रामस्थांना दिली.आतापर्यंत एन डी शिंदे यांनी केज मतदार संघातील विविध जिल्हा परिषद सर्कल मधील प्रत्यक्ष भेटी दिलेल्या गावांमध्ये डिघोळ अंबा, कानडी, पाथरा, सावलेश्वर पैठण, सदोळा, भाळगाव, बावची, आवसगाव, आणेगाव, हिवरा, धानोरा, बोरी सावरगाव, आपेगाव , इस्थळ, सौंदना, नायगाव, धनेगाव ,कोदरी, दीपेवडगाव, जानेगाव, गांजपुर,चिंचपुर, तांबवा, सनगाव, उमराई, मुळेगाव, लाडे वडगाव , होळ, कळम्बअंबा, कुरणवाडी,एलडा, चीचखंडी, राक्षसवाडी, ममदापुर, पठाण मांडवा या व यासह विविध १०० गावांना व तेथील ग्रामस्थांना प्रत्यक्ष समोरासमोर भेटी दिल्या. यावेळी ग्रामस्थांनी देखील इंजि एन डी शिंदे यांचे उत्स्फूर्त असे स्वागत करून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. मी इंजि एन डी शिंदे आपल्या गावाबरोबरच संपूर्ण मतदारसंघाचा विकास करण्यासाठी तथा येथील मूलभूत प्रश्नांची उकल करण्यासाठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवण्याची इच्छा शिंदे यांनी व्यक्त केली. यावेळी ग्रामस्थांनी देखील इंजि एन डी शिंदे यांचे म्हणणे ऐकून घेतले.या भेटीदरम्यान शिंदे यांनी ग्रामस्थांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी त्या त्या गावातील युवक, महिला तसेच त्या परिसरातील प्रतिष्ठित व जेष्ठ नागरिक यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. तेथील नागरिकांकडुन देखील इंजि एन डी शिंदे यांना सहकार्य करण्याचे आश्वासन मिळाले. आपण सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, शेतीमाल, औद्योगिक विकास, त्याचबरोबर नागरिकांच्या सर्व मूलभूत अधिकारांची उकल करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे नागरिकांना अश्वसीत केले.

## महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दिव्यांग रूग्णसाठी आयोजित शिबिराचे डॉ पिनाकिन त्रिवेदी यांचे हस्ते उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या शिबिराचे डॉ पिनाकिन त्रिवेदी यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. जगप्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ञ कै. डॉ. प्रफुल्ल विजयकर यांच्या संकल्पनेतून आणि आधारस्तंभ माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या प्रेरणेतून २००९ पासून सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक महाविद्यालय बीड येथे मतिमंद, गतिमंद, सेरेब्रल पल्सी , कर्णबधीरता, मूकबधिरपणा, लहान मुलांचे असाध्य आजार, , झटके येणे अशा विविध प्रकारच्या आजारांवर होमिओपॅथिक औषध-उपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते. आतापर्यंत जवळपास ५००० हून अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे. हे शिबिर दर तीन ते चार महिन्यांच्या



अंतराने नियमितपणे आयोजित होत आहेत. होमिओपॅथिक चिकित्सा पद्धतीच्या सिद्धांतानुसार रुग्णाची सखोल माहिती घेऊन होमिओपॅथिक औषध उपचार केले जातात. सदर शिबर होमिओपॅथिक फार्मसी विभाग ने अयोजित केले होते. यावेळी तिनशे एकेंशी रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.रुग्णाची सखोल माहिती घेऊन होमिओपॅथिक औषध उपचार केले. शिबिराचे उद्घाटन डॉ पिनाकिन त्रिवेदी (अध्यक्ष, नैतिकता आणि होमिओपॅथी नोंदणी मंडळ, एन.सी.एच., नवी दिल्ली)यानी केले. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, डॉ संजय गुप्ता(सचिव एन.सी.एच., नवी दिल्ली), सल्लागार डॉ. अरुण भस्मे,प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल,डॉ. गणेश पांगारकर(उपप्राचार्य)उपस्थित होते .डॉ.अमित भस्मे(शिबीर समन्वयक), डॉ. शेख अतिक लतिफ(प्राध्यापक व विभाग प्रमुख (..),डॉ. अंजली पांगारकर(प्राध्यापक व विभाग प्रमुख (..),डॉ. गंगेश पटकुटवार(सहयोगी प्राध्यापक),डॉ. सुहास जोशी,डॉ. रोहिदास बाजीराव वीर,डॉ. अनुपमा तिवारी,डॉ. दिपक कालभिले यांच्या उपस्थित तपासणी करण्यात आली.

## आदर्श गाव आवरगावच्या मातृभूमी गणेश मंडळाने आयोजित केल्या विविध स्पर्धा

किल्लेधारुर । प्रतिनिधी

महाराष्ट्रात आदर्श असणाऱ्या स्मार्ट ग्राम आवरगाव ता.धारूर येथे एक गाव एक गणपतीची स्थापना सर्वानुमते करण्यात आली या गणेश मंडळाला मातृभूमी प्रतिष्ठान सार्वजनिक गणेश मंडळ असे नावं देण्यात आले याच मातृभूमी गणेश मंडळाने गणेश उत्सव काळात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्यात महिलांसाठी संगीत खुर्ची स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, शालेय मुलांसाठी रनिंग स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,अशा विविध स्पर्धा ९ दिवस घेण्यात आल्या त्यामध्ये पहिली ते पाचवी चा एक गट सहावी ते बारावी चा एक गट व गावातील सर्व सुनांचा एक गट ,गावातीलच सर्व सासूंचा एक गट असे अनेक गट आयोजित केले होते त्यामध्ये प्रत्येक गटातून एक नंबर काढण्यात आले.



### संगीत खुर्चीसाठी सासू-सूनां च्या उपस्थितीने सभामंडप गजबजला

पहिल्या येणाऱ्या सासू आणि सुनास पैठणी साडी बक्षिस आहे व पहिली ते बारावी या दोन गटासाठी मुलांसाठी घड्याळ आणि मुलींसाठी पंजाबी ड्रेस असे बक्षीस जाहीर करण्यात आले व ते बक्षीस आज अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने गणेश विसर्जनाच्या मिरवनुकी दरम्यान त्या बक्षिसांचे वितरण केले जाणार आहे व या गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन मातृभूमी प्रतिष्ठान सार्वजनिक गणेश मंडळाचे सर्व सदस्यांनी केले आहे त्याचबरोबर विविध स्पर्धा आयोजित करण्यासाठी गावचे आदर्श सरपंच अमोल सर्जेराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश मंडळाचे अध्यक्ष प्रदीप नखाते यांच्यासह सर्व गणेश मंडळा च्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### पत्रकार दयानंद सोनवणे यांच्यावरील

झळ तरुणाईला, व महिला वर्गाला बसत आहे. तरुणाई व्यसनाधीन व जुगारी होत आहे. तसेच उसतोडणी मजुरांची आगाऊ उचलही या व्यसनात जात आहे. ही सामाजिक भावना लक्षात घेऊन अंमळनेर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. याचा राग धरुन पोलीसांचा हफ्ता गोळा करणारा एजंट व अवैध दारू विक्री व पत्त्याचा जुगार सर्रासपणे चालवणारे तुकाराम आतकरे व अशोक वाल्हेकर यांनी रात्री डोंगरकिन्ही ते मिसाळ वाडी रोडवर सोनवने यांना गाठुन अश्लिल भाषेत शिविगाळ करुन खाली पाडुन लाथा बुक्यांनी जबर मारहाण केली. यात पत्रकार दयानंद सोनवणे हे गंभीर जखमी झाले आहेत. याची तक्रार अमळनेर पोलिसांत दिली आहे. या अवैध धंदे चालकास पोलीसांचे अभय असुन त्याला वाचवण्यासाठी पोलिसांनी त्याला बोलावून घेऊन उलट पत्रकारावरच पैसे मागतो असा आरोप करुन गुन्हा नोंद केला आहे. हा प्रकार पत्रकारीतेला धोकादायक आहे. अवैध धंद्याची बातमी छापल्यामुळे पत्रकाराला मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली जाते मात्र पोलिसांनी अद्यापही काही कार्यवाही केली नाही. भ्याड हल्ला करणाऱ्या आरोपींना कठोर शासन करावे व दयानंद सोनवणे यांच्या वर नोंद झालेला खोटा गुन्हा तात्काळ मागे घ्यावा. नसता तीव्र आंदोलन करण्यात येईल. असे निवेदन मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांना दि.१६ सप्टेंबर रोजी देण्यात आले आहे. यावेळी छत्रपती संभाजीनगर विभागाचे समन्वयक सुभाष चौरे,राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे , जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके , जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संजय हांगे , संपादक राजेंद्र होळकर , जिल्हा समन्वयक ह.वि.कृ.समितीअभिमन्यु घरत ,तालुका निमंत्रक ह.वि.कृ.समिती मंगेश निटूरकर ,तालुका समन्वयक ह.वि.क.समिती लक्ष्मण नरनाळे,जिल्हा उपाध्यक्ष रवी उबाळे , बिड तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, कार्याध्यक्ष शेख रेहान ,कोषाध्यक्ष प्रशांत लहुरीकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### बडेवाडीत विद्यूत करंट

मिळताच विजवितरण कंपणीच्या कर्मचा-यांनी विजपुरवठा खंडीत केला मात्र त्यापुर्वीच दोन बैलांचा जिव गेला ,वा-यामुळे ओढ्याजवळील चंदनाचे झाड तारेवर तुटून पडल्याने विजेची तार तुटली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे .शाखा अभियंता रोहित कांबळे यांनी रितसर पंचनामा केला

यावेळी उपस्थित बीट अंमलदार तांदळे साहेब, मानूर सज्जाचे तलाठी भगवान टाक व पशुधन विकास अधिकारी डॉक्टर सातपुते साहेब, पशुधन पर्यवेक्षक डॉक्टर राठोड साहेब .शेतक-याची बैलजोडी मरण पावल्याने त्याची मोठी हानी झाली त्या आपद्रस्त शेतक-यांला अर्थिक मदत मिळाली पाहिजे अशी मागणी केली जात आहे.

### जखमी चिमुकलीला आरोग्य

मीडियातून समोर आल्या. अनेकांनी मदतीचा हात देखील समोर केला. मात्र खर्च जास्त असल्याने ढेंगे कुटुंब हतबल झाले होते. मराठा समन्वयक अशोक रोमन यांना ही घटना समजताच त्यांनी थेट आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या कानावर हा प्रकार घातला. थेट दोन लाखांची मदत अशोक रोमन यांच्या मार्फत सुपूर्द करण्यात आली. यावेळी औषध निर्माण अधिकारी योगेश जोशी, डॉ प्रीतम लोध, राजाभाऊ साळुंके, बाळासाहेब कदम, अभिजित मस्कर, दत्ता साळुंके, भैय्या भोसले, पप्पू लांढे, खडके मामा, सचिन हरनमारे, अमोल अंकुटे, वाजेद खान, सिद्दीकी फारुकी, मुन्नाभाई यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

आराध्याच्या कुटुंबीयांना अश्रू अनावर...

अशोक रोमन यांच्या मार्फत आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी थेट दोन लक्ष रुपयांची मदत पाठविली. मदत सुपूर्द करताना चिमुकली आराध्या हिच्या कुटुंबीयांचे डोळे पाणावले. कुटुंबाने हात जोडून आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे आभार मानले.

### नगरपरिषदेने निदेर्शीत केलेल्या

तो तीचीच रंगरंगोटी करून पुढील वर्षी नव्या रंगात आपल्या भेटीला बाप्पांला घेऊन येईल. याच बरोबर गुलाला ऐवजी फुले उधळावी, डॉल्बि ऐवजी ढोल ताशा बाजा वाजवला तर आजारी माणसे , ज्येष्ठ नागरीकांबरोबर विद्यार्थ्यांना , लहान मुलांना नाहक त्रास होणार नाही ध्वनी आणि वायू प्रदूषणही थांबता येईल.या वर्षीचा गणेशोत्सव खऱ्या अर्थाने आदर्शवत वाटला बहुतांश गणेश मंडळांनी रक्तदान अन्नदान वस्त्रदान याच बरोबर आरोग्य शिबीर विद्यार्थी पालकत्व जीवनावश्यक वस्तू वाटप आणि समाज प्रबोधन करणारे देखावे सादर केले तेंव्हा बाप्पांच विसर्जन ही आदर्शवत व्हायला पाहिजे. असे आवाहन कर्मयोध्दा गणेश मंडळांच्या आरती प्रसंगी शुभेच्छा देताना बीड नगर परिषदेच्या माजी स्वच्छता व आरोग्य सभापती सौ. जयश्री विलास विधाते यांनी केले.या प्रसंगी कर्मयोध्दा गणेश मंडळांची कार्यकरणी सदस्य आणि गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये

द्वितीय मॅच मध्ये ट्विंकल स्टार इंग्लिश स्कूल, सेमी फायनल मध्ये नारायण इंग्लिश स्कूल तसेच फायनल मध्ये गणेश विद्यालय या संघासोबत अटीतटीच्या सामन्यांमध्ये गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या खेळाडूंनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत गणेश विद्यालयाचा पराभव दणदणीत विजय मिळवला. या स्पर्धा पार पाडण्यासाठी तालुका समन्वयक उज्वल गायकवाड, संजय धस, विस्तार आधिकारी अभिजीत तांदळे,अझहर शेख, गायकवाड सर संतोष कवठेकर,शैलेश जाधव ,गाल्फाडे , तनवीर पठाण , उपस्थितीमध्ये उद्घाटन झाले व स्पर्धा पार पडण्यास सहकार्य लाभले विजयी संघामधील खेळाडू कृष्णा गायकवाड, आरशान ०पठाण यांनी नाबाद ७० रणाची भागेदारी पाच ओव्हर मध्ये केली बॉलिन मध्ये आरशान पठाण शेवटच्या शतकात फिरकी ने गुरुकुल संघाचं विजय निश्चित केला .या सामन्यामध्ये कृष्णा गायकवाड चे तुफानी अर्धा शतक ( ५५ रन) करून विजय मिळवण्या साठी मोलाचे योगदान दिले, सार्थक कोकरे,अन्वित सुभेदार, संग्राम तळेकर,मोहम्मद नबील, संविधान सावते,रणवीर राठोड, दिप काळे, शशांक सारंगकर, दुर्गेश झांबरे, आर्यन कुटे, कैवल्य मोहिते, शालू त्रिभुवन वरील खेळाडू १४ वर्षाखालील शालेय क्रिकेटच्या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये बीड तालुक्याचे प्रतिनिधित्व करतील या विजयी खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक कल्याण माने , रामदास गिरी, महेश गव्हाणे यांच्या मुलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा डॉ. विनिता ढाकणे, सचिव डॉ.राजेंद्र ढाकणे, कार्यकारी संचालक अखिलेश ढाकणे, प्राचार्य शीतल सर्वज्ञ, उपप्राचार्य अमोल कपूर, सारा मॅम, गणेश इंगोले सर, क्रीडा शिक्षिका वाघमारे मॅडम अन्य प्रशिक्षक व पालकांनी मुलांचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
बुधवार दि.१७ सप्टेंबर २०२४ ४

# पीककर्ज वाटपप्रकरणी दाखल गुन्हे मागे घ्या

**धाराशीव । प्रतिनिधी**

**धाराशीव जिल्ह्यात उद्दिष्टानुसार पीककर्जाचे वाटप न केल्याप्रकरणी दहा बँक अधिकाऱ्यांविरुद्ध जिल्हा प्रशासनाने गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईमुळे बँक अधिकारी व कर्मचारी संतप्त झाले असून, जिल्हाधिकाऱ्यांनी ३० ऑगस्टच्या बैठकीत आश्वासन दिल्यानुसार नव्याने अहवाल मागवून हे गुन्हे मागे घ्यावेत. या व अन्य मागण्यांसाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियनच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांना निवेदन देऊन सायंकाळी बँक परिसरात टॉर्च मार्च काढण्यात आला. यात टॉर्च चालू मोबाइल उंचावत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मागण्यांच्या घोषणा दिल्या.**

याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की सरकारच्या बहुतांश लोकहिताच्या योजना बँकांमार्फत राबवल्या जातात. बँक अधिकारी व कर्मचारी रात्रंदिवस व प्रसंगी सुटीच्या दिवशी काम करून योजनेच्या अंमलबजावणीत योगदान देतात. असे असतानाही राज्यात बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांवर राजकीय व सवंग प्रसिद्धीसाठी हल्ले केले जात आहेत. या घटना घडत असताना जिल्हा प्रशासनाचाच एकमेव आधार अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे.



प्रशासनाकडून संरक्षण मिळाले तरच अधिकारी व कर्मचारी सुरक्षित भावनेने काम करू शकतात. मात्र जिल्ह्यात उद्दिष्टानुसार पीककर्जाचे वाटप केले नाही म्हणून विविध दहा बँकांच्या शाखाधिकाऱ्यांविरुद्ध पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कर्जवाटपात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणतीही दिरंगाई केलेली नाही. कारवाईमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये एक प्रकारची नकारात्मक व असुरक्षिततेची भावना तयार झाली आहे. या पार्श्वभूमीवर ३० ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत आश्वासन दिल्यानुसार पुन्हा एकदा अहवाल मागवून घेऊन बँक अधिकाऱ्यांवर दाखल गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या वेळी संघटनेचे भूषण महाजन, धनंजय कुलकर्णी, प्रताप हंथराळे, कृष्णा बरुरकर, संतोष गदादे यांच्यासह धाराशिव, सोलापूर, लातूर आणि बीड जिल्ह्यातील कर्मचारी उपस्थित होते.

## वीज विकून शेतकरी पैसे कमवणार-फडणवीस

सौर कृषीपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं

कृषीपंपाच्या वीज जोडणीसाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षे वाट पाहावी लागली. पण आता मागेल त्याला सौर कृषीपंप देण्याची योजना सुरु झाली आहे. यामुळं आगामी काळात सौर कृषीपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल, असे मत उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत लाभार्थी शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या संकेतस्थळाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. योजनेची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे व पोस्टरचे प्रकाशनही त्यांनी यावेळी केले. शेतकरी हा वीजबिल भरणाऱ्याऐवजी वीज विकून उत्पन्न मिळविणारा होईल

सौर कृषीपंपाच्या पॅनेल्समधून निर्माण होणारी अतिरिक्त वीज ग्रीडमध्ये पाठवून वीज कंपन्यांना विकता येईल व त्यातून शेतकऱ्याला अतिरिक्त उत्पन्न मिळविता येईल, अशी योजना लागू करण्यात येईल असे फडणवीस म्हणाले. त्यामुळं शेतकरी हा वीजबिल भरणाऱ्याऐवजी वीज विकून उत्पन्न मिळविणारा होईल असं ते म्हणाले. राज्यात २०१४ पूर्वी शेतकऱ्यांना पेड पेंडिंगची समस्या तीव्रतेने जाणवत होती. त्यानंतर शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यावर भर देण्यात आला. आता मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे शेतकऱ्यांना ९० टक्के सबसिडीसह तत्काळ पंप मिळत आहे असेही ते म्हणाले. सौर कृषी पंपामुळे शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा सौर कृषी पंपामुळे शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा होत आहे. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीज निर्मिती होत असल्याने तेवढा काळ वीजबिल येणार नाही. साडेसात एचपी पंपाचा विचार केला तर २५ वर्षांच्या कालावधीत त्या शेतकऱ्याचे वीजबिलाचे १० लाख रुपये वाचणार आहेत.

## विस्माच्या अध्यक्षपदी बी. बी. ठोंबरे, उपाध्यक्षपदी आ. रोहित पवार




पुणे : वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (विस्मा) च्या नवनिर्वाचित कार्यकारी मंडळ सभेने तीन वर्षाकरीता (२०२४-२०२७) अध्यक्षपदी बी. बी. ठोंबरे, उपाध्यक्षपदी आ.रोहित पवार आणि महासचिव म्हणून डॉ. पांडूरंग राऊत यांची सर्वानुमते निवड केल्याची माहिती निवडणूक अधिकारी, 'विस्मा'चे कार्यकारी संचालक अजित चौगुले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. तसेच साखर उद्योगातील तज्ञ मानद सदस्य म्हणून माजी साखर आयुक्त आणि 'यशदा'चे अतिरीक्त महासंचालक शेखर गायकवाड व श्री रेणूका शुगर्स लि. (नवी दिल्ली) चे कार्यकारी संचालक रवि गुप्ता यांची निवड करण्यात आल्याचे पत्रकात म्हटले आहे.

वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (पुणे) ही महाराष्ट्र राज्यातील १३३ खाजगी साखर कारखान्यांची शिखर संस्था असुन, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ३१ ऑगस्ट, २०२४ रोजी पुणे येथे झाली. या सभेमध्ये 'विस्मा'चे नविन कार्यकारी मंडळ सदस्य सन २०२४-२७ कालावधीसाठी बहुमताने निवडून आल्याचे अजित चौगुले यानी जाहीर केले. कार्यकारी मंडळातील सदस्य पुढीलप्रमाणे : १) बी. बी. ठोबरे (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, नॅचरल शुगर जिल्हा यवतमाळ), २) आमदार रोहित पवार (मुख्य कार्यकारी अधिकारी बारामती ॲग्रो लि. जि. पुणे), ३) डॉ. पाडूरंग राऊत (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि. जि. पुणे), ४) खासदार बजरंग सोनवणे, (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्टस्? लि. जि.बीड), ५) श्री. महेश देशमुख (अध्यक्ष लोकमगल इंडस्ट्रिज ग्रुप, जि. सोलापूर),६) रणजित मुळे (कार्यकारी संचालक, गगामाई इडस्ट्रिज ॲण्ड कन्स्ट्रक्शन्स लि. जि अहमदनगर), ७) यशवर्धन डहाके (अध्यक्ष पराग ॲग्रो फुड्स ॲण्ड अलाईड प्रोडक्टस्? प्रा. लि. जि. पुणे), ८) सौ. गौरवी भोसले (अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका, जागृती शुगर ॲण्ड अलाइंड इंडस्ट्रिज लि. जि. लातूर), ९)योगेश पाटील (कार्यकारी संचालक, अथणी शुगर्स लि. जि. सातारा) १०) राहूल घाटगे (कार्यकारी संचालक, श्री गुरुदत्त शुगर्स लि. जि. कोल्हापूर), ११)रोहित नारा (संचालक, सदगुरु श्री श्री साखर कारखाना लि. जि. सागली).

## २४ तासातच खाद्यतेलांच्या किंमती वाढतात कशा?

### सर्वसामान्यांनी थोडी कळ सोसावी : रविकांत तुपकर

एकीकडं सोयाबीन आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सरकारनं दिलासा दिला आहे. तर दुसऱ्या बाजुला २४ तासातच खाद्यतेलाच्या किंमतीत वाढ झाली आहे. राज्यात खाद्यतेलांच्या किंमतीत २० ते २५ रुपयांची वाढ झाली आहे. यावर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शेतकऱ्यांच्या खिशात चार पैसे येत असतील तर सर्वसामान्यांनी थोडी फार कळ सोसावी असे तुपकर म्हणाले. तसेच शेतकऱ्यांना दिलासा दिल्यानंतर २४ तासातच खाद्य तेलांच्या किंमती वाढतात कशा? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

कच्च्या तेलावर आयात शुल्क वाढवून २० टक्के केलं आहे. मात्र, दुसरीकडे शेतकऱ्यांना दिलासा देणारी घोषणा करताच २४ तासाच्या आत राज्यातील खाद्य तेलाचे भाव मात्र २० ते २५ रुपये प्रति किलोने वाढवले जात आहेत. यामुळं मात्र शेतकऱ्यांना जरी दिलासा मिळाला असला तरी सर्व सामान्यांना मात्र आता खाद्यतेलाच्या वाढलेल्या भावामुळे दणका बसला आहे.

शेतकऱ्यांच्या खिशात जर चार पैसे येत असतील तर कुणाच्या पोटात दुखायला नको शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्यानंतर २४ तासातच खाद्यतेलांच्या किंमती वाढल्या यावर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शेतकऱ्यांच्या खिशात जर चार पैसे येत असतील तर कुणाच्या पोटात दुखायला नको..! जर शेतकऱ्यांना दिलासा मिळत असेल तर सर्वसामान्यांनी थोडीफार कळ सोसायलाच पाहिजे असे तुपकर म्हणाले. शेतकऱ्यांना दिलासा दिल्यानंतर २४ तासातच खाद्यतेलांच्या किमती वाढतातच कशा ? यामागे व्यापाऱ्यांची एक विशिष्ट लॉबी काम करत आहे? आपण मॉलमध्ये गेलो, बियर बारमध्ये गेलो तर भाव करत नाही. मात्र, शेतकऱ्यांचं भलं होत असेल तर या लोकांच्या पोटात दुखतं. सरकारने दोन्ही गोष्टी नियंत्रणात ठेवाव्यात असे तुपकर म्हणाले. अचानक खाद्य तेलाच्या किंमतीत वाढ झाल्याने सामान्य ग्राहकाला झळ

आज अचानक खाद्य तेलाच्या किमतीत वाढ झाल्याने सामान्य ग्राहकाला याची झळ बसली आहे. सोयाबीन दरवाढीसाठी तेलाच्या आयात शुल्कात वाढ करण्याची मागणी करण्यात आली होती. सरकारनं ती मागणी मंजूर केली आहे. केंद्र सरकारकडून कच्चे सोयाबीन,पाम तेल, सूर्यफूल तेलावरील आयात शुल्कात २० टक्क्यां पर्यंत वाढ तर रिफाइड सूर्यफूल, सोयाबीन तेलावरील आयात शुल्क १३.७५ टक्क्यांवरुन वरून ३५.७५ टक्के वाढवण्यात आलं आहे. सोयाबीन दरवाढीसाठी तेलावरील आयात शुल्कात २० ते ३० टक्के वाढ करावी ही मागणी करण्यात आली आहे.




## जनावरांच्या आहारात खनिजमिश्रणांचे महत्व

खनिजद्रव्यांचे थोडक्यात महत्व काय असते याची माहिती आजच्या लेखात करून घेऊयात. खनिजमिश्रणे हि नवजात वासराच्या वाढीसाठी अत्यंत महत्वाची असतात. जनावरांच्या हाडांना बळकटी देण्याचे कार्य खनिज मिश्रणांमार्फत केले जाते. पचनासाठी व प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी खनिजद्रव्ये महत्वाचे कार्य करत असतात. खनिजमिश्रणे गर्भाशयातील वासराच्या वाढीसाठी अत्यंत महत्वपूर्ण असतात. खनिजद्रव्ये उदा. कॅल्शिअम व फॉस्फोरस हाडांच्या निर्माणासाठी व त्यांच्या मजबुतीसाठी कार्य करत असतात. खनिजद्रव्यांच्या आहारातील समावेशामुळे प्रजनन शक्तीस बळकटी मिळून दोन वेतांमधील अंतर कमी केले जाऊ शकते.

खनिजमिश्रणांच्या नियमित सेवनाने जनावराच्या गाभण न राहणे अथवा जनावर वारंवार उलटणे..इ. समस्यांवर मात करता येते. जनावरांच्या वेतानंतर येणारा शारीरिक ताण भरून काढण्यासाठी खनिजमिश्रणे महत्वाची भूमिका बजावत असतात. खनिजमिश्रणे जनावरांच्या दुग्धोदपादनात महत्वाचे कार्य करत असतात. शारीरिक जखमा व झीज भरून काढण्यासाठी. जनावरांना दीर्घ काळापर्यंत उत्पादनक्षम बनवून ठेवण्यासाठी.

खनिजमिश्रणांच्या कमतरतेमुळे होणारे आजार: रोगप्रतिकारक क्षमता कमी होणे. जनावर वेळेवर



माजावर न येणे. गाभण राहण्यासंदर्भातील अडचणी उद्भवणे. जनावरांच्या कार्यक्षमतेत किंवा उत्पादनात घट येणे. पचनक्रियेसंबंधित अडचणी उद्भवणे. न्यूमोनिया सारख्या गंभीर रोगाची लागण होणे. जनावरांमधील वंध्यत्व किंवा वांझपणासंबंधी तक्रारी उद्भवणे. वयात येण्यासाठी होणार विलंब. जनावरांमधील रक्तक्षय. वर न पाडण्यासंदर्भातील अडचणी उद्भवणे. स्तनदाह (कासदाह). हाडांचे आजार. १३.गर्भपात. अशक्त किंवा मेलेले वासरू जन्माला येणे. अंडाशयासंबंधित विकार उद्भवणे. जनावरांमधील हगवण. गर्भाशयातील दाह किंवा जळजळ. जनावरांमधील गलगंडइ.लक्षणे व आजार खनिजमिश्रणांच्या कमतरतेमुळे दिसून येतात.

खनिजमिश्रणे व त्यांचे विशिष्ट कार्ये : कॅल्शिअम: दुग्धोत्पादन वाढीसाठी, हाडांच्या वाढीसाठी. आणि स्नायूंच्या कार्यासाठी. फॉस्फोरस : हाडांच्या वाढीसाठी व त्यांच्या देखभालीसाठी. दुग्धोत्पादन व स्नायूंच्या देखभालीसाठी. सेलेनियम : वार अडकणे, गर्भाशयाचा दाह, बीजांडकोशाच्या सुरळीत कार्यासाठी, सांधा निखळणे व रोगप्रतिकार क्षमता वाढविण्यासाठी. कोबाल्ट : प्रजननासंबंधित तक्रारी, जीवनसत्व निर्मिती (१२) प्रतिकारशक्ती, उत्पादनवाढीसाठी.

सोडियम : शरीरद्रव्यांच्या सामू नियंत्रणासाठी (उदा. रक्त, प्रोटोप्लासम..इ.), पाणी संतुलन व दुग्धोपादनासाठी. स्नायू व मज्जातंतूच्या कार्यासाठी. पोटॅशिअम : मज्जासंस्थेच्या कार्यासाठी, पाणी संतुलनासाठी इ. मँगनीज : गर्भाच्या वाढीसाठी, स्तनवृद्धीसाठी, दूध उत्पादन आणि दीर्घकाळ माजासाठी. कॉपर : हिमोग्लोबीन निर्मितीसाठी, प्रजनन, केराटिन संश्लेषणासाठी (केस व लोकर उत्पादनासाठी), पोटासंबंधित आजारासाठी. झिंक : प्रजनन, वासरांच्या वाढीसाठी, आणि पोटाच्या तक्रारीसाठी इ.

तर अश्या रीतीने जनावरांच्या आहारात वरील खनिजद्रव्यांचा समावेश केल्यास जनावरांचे विविध आजार व लक्षणांपासून संरक्षण केले जाऊ शकते.




### जागतिक दिवस:
### मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन

### महत्वाच्या घटना

१६३० : बॉस्टन शहराची स्थापना झाली
१९४८ : हैदराबादच्या निजामाने शरणागती पत्करली आणि हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.
१९५७ : मलेशियाचा संयुक्त राष्ट्रात प्रवेश
१९८३ : वनीसा विल्यम्स 'मिस अमेरिका' बनणारी पहिली कृष्णवर्णीय स्त्री ठरली.
१९८८: दक्षिण कोरियातील सेऊल येथे २४ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
२००१ : सप्टेंबर ११ च्या अतिरेकी हल्ल्यांनंतर न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंज पुन्हा सुरू झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७९ : पेरीयार ई. व्ही. रामस्वामी स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि द्रविड चळवळीचे प्रणेते (मृत्यू: २४ डिसेंबर १९७३)
१८८२ : अवंतिकाबाई गोखले महात्मा गांधीच्या पट्टशिष्या, चरित्रकार, परिचारिका व 'हिंद महिला समाज'च्या संस्थापिका (मृत्यू: १९४९)
१८८५ : केशव सीताराम तथा प्रबोधनकार ठाकरे पत्रकार, समाजसुधारक, लेखक, वक्ते व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील एक प्रमुख कार्यकर्ते (मृत्यू: २० नोव्हेंबर १९७३)
१८९१ : दक्षिण अफ्रिकन गणराज्यचे पहिले अध्यक्ष मार्थिनस वेस्सेल प्रेतोरीयस यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे १९०९)
१९०० : जे. विलार्ड मेरिऑट मेरिऑट कॉर्पोरेशनचे संस्थापक (मृत्यू: १३ ऑगस्ट १९८५)
१९०६ : ज्युनिअस जयवर्धने श्रीलंकेचे दुसरे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १ नोव्हेंबर १९९६)
१९१४ : थॉमस जे. बाटा बाटा शू कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १ सप्टेंबर २००८)
१९१५ : मकबूल फिदा हुसेन चित्रकार व दिग्दर्शक (मृत्यू: ९ जून २०११)
१९२२ : अँगोलाचे पहिले राष्ट्रपती अँगोलांनो नेटो यांचा जन्म. (मृत्यू: १० सप्टेंबर १९७९)
१९२९ : अनंत पै ऊर्फ 'अंकल पै' 'अमर चित्र कथा' चे जनक (मृत्यू: २४ फेब्रुवारी २०११)
१९३० : लालगुडी जयरामन व्हायोलिनवादक, संगीतकार व गायक (मृत्यू: २२ एप्रिल २०१३)
१९३२ : भारतीय-इंग्लिश पत्रकार इंद्रजीत सिंग यांचा जन्म.
१९३७ : सीताकांत महापात्र १९९३ चा ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रख्यात ओडिया कवी
१९३८ : दिलीप पुरुषोत्तम चित्रे लेखक, कवी आणि टीकाकार (मृत्यू: १० डिसेंबर २००९)
१९३९ : रविंद्र सदाशिव भट गीतकार (मृत्यू: २२ नोव्हेंबर २००८)
१९४५ : भारतीय धार्मिक गुरु भक्ति चारू स्वामी यांचा जन्म.
१९५० : नरेन्द्र मोदी गुजरातचे पूर्वमुख्यमंत्री, प्रधानमंत्री भारत (२०१४)
१९५१ : डॉ. राणी बंग समाजसेविका
१९८६ : भारतीय क्रिकेटपटू रवीचंद्रन अश्विन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७७ : हेन्री फॉक्स टॅलबॉट छायाचित्रणकलेचा पाया घालणारे (जन्म: ११फेब्रुवारी १८००)
१९३६ : हेन्री लुईस ली चॅटॅलिअर फ्रेन्च रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ८ आक्टोबर १९५०)
१९९४ : व्हिटास गेरुलायटिस अमेरिकन लॉन टेनिसपटू (जन्म: २६ जुलै १९५४)
१९९९ : हसरत जयपुरी गीतकार (जन्म: १५ एप्रिल १९२२)
२००२ : विश्वनाथ वामन तथा वसंत बापट कवी व संगीतकार (जन्म: २५ जुलै १९२२)

# अजय-अतुल यांनी प्रत्येक वर्षी गणेशोत्सवात परळीत यावे

## धनु भाऊंची ती मागणी केली अजय अतुल यांनी पूर्ण | अजय-अतुल यांची लाईव्ह कॉन्सर्ट | अजय-अतुल यांच्या गीत-संगीताने परळीकर मंत्रमुग्ध | 'त्या' गीताची फर्माईश केली पूर्ण

परळी । प्रतिनिधी

जागतिक दर्जाचे व आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक असलेले गायक, गीतकार व संगीतकार अजय गोगावले व अतुल गोगावले हे परळीत दुसऱ्यांदा आले असून मागच्या वेळी त्यांनी ट्रॅक परफॉर्मन्स दिला होता तेव्हा आपण त्यांना त्यांच्या संपूर्ण संगीतकारांच्या व पार्श्वगायकांच्या टीमसह लाईव्ह कॉन्सर्ट करण्याची विनंती केली होती व आज त्यांनी ती विनंती पूर्ण केली. यापुढे अजय-अतुल यांनी त्यांच्या जगप्रसिद्ध संगीतकार व पार्श्वगायकांच्या संपूर्ण टीमसह प्रत्येक वर्षी परळीच्या गणेशोत्सवात यावे, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी सुप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय-अतुल यांना केली व त्यांनी ती लगेचच मान्य केल्याचे घोषित केले.



नामदार धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवात काल सायंकाळी जगप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय-अतुल यांची ५० संगीतकार व पार्श्वगायकांच्या समूहासह लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्यात आली होती. यावेळी लल्लाटी भंडार, देवा श्री गणेशा, याड लागलं, तुझ्या प्रीतीचा विंचू मला चावला यांसारख्या सुप्रसिद्ध अशा एकापेक्षा एक सरस गीतांनी अजय-अतुल यांनी परळीकरांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. दरम्यान धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठानच्या वतीने अजय-अतुल यांच्यासह त्यांच्या टीमचे फेटा बांधून, शाल व सन्मानचिन्ह देऊन स्वागत केले. यावेळी बोलताना धनंजय मुंडे यांनी अजय गोगावले यांना त्यांचे प्रसिद्ध 'उमगाया बाप रे' हे गीत गाण्याची फर्माईश केली, त्याचबरोबर अजय गोगावले यांनी त्यांची ती फर्माईश पूर्ण करत त्यांच्या खास शैलीत उमगाया बाप रे हे गीत गाऊन अगदी भावनिक वातावरण निर्माण केले. गणेशोत्सवात उभारण्यात आलेले स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे सभागृह संपूर्णपणे भरून त्यापेक्षाही जास्त लोक आजूबाजूला व रस्त्यावर उभे राहून या संपूर्ण कार्यक्रमाचा आनंद घेत होते. जवळजवळ चार तास चाललेल्या या लाईव्ह कॉन्सर्ट मध्ये एकही माणूस इकडचा तिकडे उठून गेला नाही.

# माजलगावात मोफत रोगनिदान शिबिर

## डॉ.राधाकिसन डाके यांचा स्तुत्य उपक्रम



माजलगाव। प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी व माउली हार्ट अँण्ड क्रिटिकल केअर संयुक्त विद्यमाने श्री गणेश उत्सव २०२४ निमित्त माजलगाव तालुक्यातील उमरी बुद्रुक या ठिकाणी भव्य मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन दि १५ सप्टेंबर रविवार रोजु करण्यात आले होते.

सदरील शिबिरास माजलगाव तालुक्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद प्राप्त होऊन २५० पेक्षा अधिक नागरिकांनी रोगनिदान तपासनीत आपला सहभाग नोंदवला.तसेच सदरील कार्यक्रमाचे प्रोजेक्ट चेअरमन रोटरीचे सदस्य हृदयरोग तज्ञ डॉ. राधाकिसन डाके, यांनी आजच्या धावपळीच्या युगामध्ये निरोगी आरोग्य सुंदर जीवन कसे जगावे व जीवन जगताना योगा व व्यायमाचे महत्व सांगून हृदयाची काळजी कशी घ्यावी या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.सदरील कार्यक्रमास रोटरी क्लबच्या सचिव सौ.लता जोशी, माजी अध्यक्ष श्री राजेश देशपांडे व सर्व सन्माननीय संचालक मंडळ उपस्थीत होतें.तसेच रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड.रवींद्र कानडे यांनी सांगितले कि, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने माजलगाव तालुकयातील नागरिकांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा संकल्प केला असून नक्कीच त्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.तसेच स्थानिक आयोजक उंबरी बुद्रुक चे सरपंच,उपसरपंच, सर्व गणेश मंडळ व समस्त गावकरी मंडळी यांनी उत्स्फूर्तपणे सदरील शिबिराचे उत्कृष्ट आयोजन व सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले.व रोगनिदान शिबीर यशस्वीपणे संपन्न झाले.

# ॲड. नरसिंह जाधव यांना जनसामान्यांची पसंती वाढली



पाटोदा

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघात निवडणुकीचा जोर चांगलाच वाढू लागला असून, इच्छुक उमेदवार आपापल्या पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळवण्यासाठी आटापिटा करू लागले आहेत. उमेदवारी आपल्यालाच मिळणार असा दावा जनसंपर्क दौऱ्यातून केला जात आहे. यामध्ये शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे इच्छुक उमेदवार ॲड.नरसिंह जाधव यांनी गेल्याच आठवड्यात शरद पवार यांची भेट घेऊन मतदार संघात केलेल्या संपर्क दौऱ्याचा अहवाल सादर केल्यानंतर पवार यांनीही जाधव यांना वेगाने संपर्क दौरा वाढविण्याची सूचना करून उमेदवारीबाबत ग्रीन सिग्नल दिल्याने आता आष्टी मतदार संघातून ॲड. नरसिंह जाधव यांना जनसामान्यातून मोठी पसंती मिळू लागली आहे. मतदारसंघातील अनेक गावातून त्यांना भेटीसाठी येण्याचे निमंत्रण दिले जात आहे. गावागावातून गणेश मंडळाचे आरतीचे निमंत्रणे, संपर्क दौऱ्यात गावागावातून मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत करण्यात येत असून आम्ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासनही नागरिक आता जाधव यांना देऊ लागले आहेत.। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्याचा दौरा जवळजवळ पूर्ण करत आता शिरूर तालुक्यात त्यांनी दौऱ्याला सुरवात केलेली दिसत आहे जाटनंदुर, शिंदफाना, राक्षसभुवन, गोमळवाडा, शिरूर शहर ॲड. जाधव यांनी रविवारी आदी गावांना भेटी दिल्या.डोंगरकिन्ही येथे सरपंच अण्णासाहेब येवले, तालुका कार्यध्यक्ष बाबुराव म्हस्के, ग्रा.प.सदस्य नवनाथ मळेकर, केशव चव्हाण, राजेंद्र मस्के आदींची भेट घेतली. तर जाटनांदूर येथे गंगाराम जेधेसर, सुंदरबापू जेधे, महदेव जेधे, बाळासाहेब जेधेसर, नामदेव चव्हाण, अशोक चौधरी, गौतम घायाळ, चेअरमन एस. पी. चौधरी, सरपंच सचिन माने आदी गावकरी उपस्थित होते. नाळवंडी येथे माजी सरपंच विठ्ठल गुजर, माजी सरपंच भगवान काकडे, पोलीस पाटील विठ्ठल पठाडे, भरत गुजर, ग्रा.पं. सदस्य गणेश मळेकर, तालुका सरचिटणीस मौलाभाई शेख,शहामद शेख, बबन पाटील आदी ज्येष्ठ मंडळी ॲड. जाधव यांचे स्वागत केले. पाटोदा तालुक्यातून पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाकडून ॲड. नरसिंह जाधव हे निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असून त्यांनी पक्षाकडे आपल्याला उमेदवारीची संधी मिळावी अशी मागणी केली आहे. त्यासाठी त्यांनी मतदारसंघातील गावागावात भेटी देऊन सर्व सामान्य लोकांशी चर्चा केली. यावेळी जनतेतून त्यांना उस्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मतदार संघातील प्रस्थापित नेत्याबद्दलचा रोष नागरिक बोलून दाखवित आहेत. संपर्क दौऱ्यात तालुक्यातील विविध सामाजिक, राजकीय विषयांवर चर्चा करण्यात येऊन. सर्व सामान्यांच्या समस्या ऐकून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावले जात आहेत. काही प्रकरणात न्यायालयीन लढा लढण्यासाठी कायदेशीर मदतही लोकांना होत असल्याने जनतेतून त्यांना उस्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

# भगवान बाबांच्या आशिर्वादाने परमार्थ श्रीमंत झाला -सुरेश महाराज

चकलंबा । प्रतिनिधी

ऐश्वर्या संपन्न संत भगवान बाबा यांच्या आशीर्वादाने परमार्थ श्रीमंत झाला. श्रीमंत,संत आणि शांत या दैवी गुणांचा समुच्चय संत एकनाथ महाराजा नंतर भगवान बाबा मध्येच आढळतो. असे प्रतिपादन सुरेश महाराज जाधव यांनी केले. श्रीक्षेत्र चकलांबा येथे आयोजित भव्य अखंड हरिनाम सप्ताहातील चौथ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी कीर्तनासाठी प्रमुख उपस्थिती, भगवान महाराज खेडकर, साईनाथ महाराज गुंजाळ,कैलास महाराज खेडकर,सोपान महाराज वडणे,अंगद महाराज,पप्पू खेडकर यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती..



गेवराई तालुक्यातील श्रीक्षेत्र चकलांबा येथे जागृत रोकडेश्वर हनुमान मंदिरात ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा यांनी सुरू केलेल्या भव्य अखंड हरिनाम सप्ताहात पाचव्या दिवसाची कीर्तन पुष्प सुरेश महाराज जाधव यांनी गुंफले. संत तुकाराम महाराजांच्या भक्तीचे ते वर्म जयाचे हाती! तया घरी शांती क्षमा द्या!! या अभंगावर सुंदर चिंतन मांडले. मृत्यू लोकांमधील प्रत्येक जीव हा मिळकतीच्या पाठीमागे लागलेला आहे, मिळकत मिळवण्यासाठी धडपडेपर्यंत प्रयत्न करतो, कुठलाही लाभ पदरात पाडून घ्यायचा असेल तर त्यासाठी प्रयत्न करावे लागतात, दैव अनुकूल असावं लागतं, वर्म माहीत असावं लागतं तरच फळ पदरात पडते, तुका म्हणे वर्म जाणोनी करावे! एक न घालावे एकावरी!! वर्म जाणून केलेल्या कुठल्याही गोष्टीचे फळ लवकर मिळते आणि वर्म न जाणता केली तर फजिती होते नाश होते आणि अवकाळा देखील होते.. मृत्यू लोकात फळ देणारी वस्तू दूर असेल तर लोक तिकडे प्रवृत्त होतात, फळ न देणारी वस्तू जवळ असेल तर ढुंकूनही पाहत नाहीत. फळ मिळवायचा असेल तर सामग्री असावी लागते, त्याला उदाहरण देताना शेती करायची असेल तर ज्ञानेश्वर महाराजांच्या ओवी प्रमाणे, भूमी बीज नांगरू !यया भांडवलाचा आधारू! घेऊनी लाभो अपार मिळविणे जेवी !! असे उदाहरण देत कुठलेही काम करायचे असेल तर सामग्री आणि त्याचे व्यवस्थापन नियोजन अगोदर असले पाहिजे, तसेच बालपणाची मिळकत ,तरुणपणाची मिळकत ,आणि म्हातारपणाची मिळकत यासाठी प्रत्येक जण प्रयत्नशील असतोच. बालपणीचे संस्कारच आयुष्यभर पुरणारे असतात त्यामुळे बालपणी चांगल्या पद्धतीने संस्कार आणि शिक्षण घेतले तर जीवन चांगले होऊ शकते असेही सुरेश महाराज यांनी सांगितले.. जैसे तैसे राहे देवाचे हे देणे! प्रयत्न करिता त्याने काय नोहे!! या तुकाराम महाराजांच्या अभंगाचे उदाहरण देत प्रयत्न केला तर काहीही करता येऊ शकते. त्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत देरे हरि आणि पलंगावरी अशी अवस्था आज राहिली नाही. आइत्या च्या जीवावर काहीही चालणार नाही त्यामुळे स्वकर्तृत्वातून स्वतःची ओळख निर्माण करायला शिका असेही महाराजांनी सांगितलं. भक्तीचे वर्म ज्या महापुरुषाच्या हातात असते त्याच्या जीवनामध्ये नऊ फळ मिळतात. संत भगवान बाबांसारख्या महापुरुषांकडे भक्तीचे वर्म माहीत होते. त्यांच्या आशीर्वादाने परमार्थ श्रीमंत झाला असेही सुरेश महाराज म्हणाले. या कीर्तनात साथसंगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ,गायनाचार्य ,वादनाचार्य यात भगवान महाराज खेडकर, साईनाथ महाराज गुंजाळ,कैलास महाराज खेडकर, सोपान महाराज वडणे, अंगद महाराज ,यांची उपस्थिती.

# धारूर शहरामधील शेतकरीपुत्र स्वप्निल धोत्रे बनला डॉक्टर



धारूर। प्रतिनिधी

धारूर शहरातील अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबातील स्वप्निल धोत्रे याने हलाखीच्या परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण करून नुकताच दंत रोग चिकित्सक म्हणून पास झाला त्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय डेंटल कॉलेज सोलापूर या कॉलेज मधून आपले शिक्षण पूर्ण केले आहे. पंडित दीनदलाय उपाध्याय डेंटल कॉलेज सोलापूर मधून त्याने यश संपादन केले आहे त्याच्या या यशा बद्दल मित्रपरिवार ,कुटुंबीय, व पत्रकार बांधव यांनी त्याचा सन्मान केला त्याच्या यशाबद्दल धारूर शहरातील विविध भागात त्याचा सत्कार करण्यात आला तसेच विविध मान्यवर मंडळींनी पुढील वाटचलीसाठी शुभेच्या दिल्या आहेत. दुतीय रँक मध्ये उत्तीर्ण झाला आहे धोतरे कुटुंबीय व मित्र परिवाराने त्याचा सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात तीन दिवसीय व्याख्यानमाला

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सुंदररावजी सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि. १८ ते २० सप्टेंबर दरम्यान तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.या व्याख्यानमालेत ख्यातनाम वक्ते वसंत हंकारे, प्रसिद्ध कवयित्री डॉ.वृषाली किन्हाळकर व प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात प्रतिवर्षी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही दिनांक १८,१९ व २० सप्टेंबर रोजी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने १८ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते वसंत हंकारे यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार असून ते 'शिक्षण व्यवस्था आणि नैतिक मूल्ये' या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आमदार प्रकाश सोळंके भूषविणार आहेत. १९ सप्टेंबर रोजी व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प प्रसिद्ध कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर या गुंफणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगलाताई सोळंके राहणार आहेत. डॉ. किन्हाळकर 'रंग मनाचे, रंग नात्याचे!' या विषयावर भाष्य करतील. तर प्रसिद्ध साहित्यिक विद्यासागर पाटंगणकर तिसरे पुष्प गुंफणार असून 'वर्तमान समाजव्यवस्था आणि नैतिकता' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऍड. भानुदास डक उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानमालेत प्रोत्साहनपर व्याख्यान होणार असून विद्यार्थी विद्यार्थिनी,पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, डॉ. एम. ए. कव्हळे, मराठी विभागप्रमुख डॉ. भाऊसाहेब राठोड, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवनकुमार शिंदे, प्रा. अशोक दौंडे, प्रा. ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केली आहे.

# संतश्रेष्ठ श्री गुरूलिंग स्वामींची परळीत निघाली पालखी

## अखंड शिवनाम सप्ताहाची भक्तीपूर्ण वातावरणात सांगता

परळी । प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाज परळी व श्री गुरूलिंग स्वामी देवस्थानच्या वतीने दि.७ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या संतश्रेष्ठ श्री गुरूलिंग स्वामी यांच्या १२३ व्या पुण्यतिथी महोत्सव व अखंड शिवनाम सप्ताहाची शुक्रवार दि.१३ सप्टेंबर रोजी भक्तीपूर्ण व उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. यानिमित्त शहरातील प्रमुख मार्गावरून पालखी काढण्यात आली. शिवनामाचा एकच गजर, जागोजागी भाविकांकडून श्रीं च्या पालखीवर करण्यात आलेली पुष्पवृष्टी हे या पालखी सोहळयाचे वैशिष्टय असून आजच्या पालखी सोहळयाला शिवभक्तांची मोठी गर्दी झाली होती. सदगुरू श्री सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण सोहळा पार पडला. सप्ताहात त्यांचे आशिर्वचन पार पडले. आपल्या आशिर्वचनातून महाराजांनी सामाजिक, सार्वजनिक शांततेसाठी सर्वांनी प्रयत्न करावेत व शरीर शुद्धीकरणासाठी शिवनाम जपावे असे सांगितले. यावेळी संतश्रेष्ठ गुरुलिंग स्वामी मठ बेलवाडी संस्थांचे अध्यक्ष दत्तापा ईटके गुरुजी वक्रेश्वर देवस्थान चे अध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे यांनी यावेळी आपले विचार मांडले



यावेळी वक्रेश्वर देवस्थानच्या विश्वस्त पदी श्री श्याम बुद्रे प्रकाश खोत श्रीमती प्रेमला वेरुळे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला,अन्नदाते श्री चंद्रकांत आप्पा बुरांडे, शिवप्रसाद चौधरी, नागेश सुगरे, अविनाश चौधरी, विजय नरवणे, सुभाष चौधरी तसेच गुरुलिंग स्वामी मठ मंदिर स जीर्णोदरासाठी भाविक श्री सोमनाथ कुरमुडे महादेव इटके रमाकांत गुजर, सौ रमाताई आलदे सोमेश्वर बयाळे आदींचा गुरुवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी होते यावेळी श्री अँड गिरीश चौधरी, शंकर आप्पा उदगीरकर नारायणआप्पा खके चंद्रकांत आप्पा समशेट्टी मंदार नरवणे अक्षय मेनकुदळे शिवकुमार व्यवहारे आधी विश्वस्त उपस्थित होते यावेळी वर्गणी संकलन करण्यासाठी श्री महादेव ईटके, विकास हालगे, महेश निर्मळे, चंद्रकांत उदगीरकर, दत्तात्रय गोपानपाळे, सोमनाथ गोपानपाळे राजेश साखरे सर, राहुल कोदरे सचिन काटकर योगेश मेनकुदळे शिवकुमार चौंडे आदींचे गुरुवर्यांनी कौतुक केले. वैद्यनाथनगरी परळी येथे बेलवाडी मंदिरात चालू असलेल्या श्री गुरूलिंग स्वामी यांचा १२३ वा पुण्यतिथी सोहळा व अखंड शिवनाम सप्ताहाची मंगळवारी भक्तीपूर्ण व उत्साहात सांगता झाली. मागील सात दिवसांपासून येथे अखंडपणे शिवनाम सप्ताह व धार्मीक कार्यक्रम चालू होते. दरम्यान आज सकाळी ९ वा. वैद्यनाथ मंदिर येथून संतश्रेष्ठ श्री गुरूलिंग स्वामी यांची पालखी काढण्यात आली. वक्रेश्वर मंदिर येथून पुढे शहरातील प्रमुख मार्गावरून शिवनामाचा गरज करीत पालखी मार्गस्थ होत गेली.श्री संत गुरुलिंग स्वामी महाराज पालखी सुरुवात वैजनाथ मंदिर, देशमुखपार, अंबेवेस, गणेशपार, नांदूरवेस, गोपनपाळे गल्ली, आंबेवेस, भोई गल्ली मार्गे बेलवाडी येथे प्रवचन, आरती व महाप्रसादाने सांगता झाली. जागोजागी भाविकांकडून पालखीतील श्रीं चे दर्शन करण्यासोबतच पुष्पवृष्टी केली जात होती. ओम नमः शिवायचा जप, मन्मथस्वामी व गुरूलिंग स्वामींचा जय जय जयकार जागोजागी केला जात होता. वीरशैव लिंगायत समाज बांधवांचा आजच्या पालखी सोहळयात सक्रीय सहभाग होता. दोन वर्षांच्या कालखंडानंतर पालखी सोहळा झाल्याने सर्वांनाच हा सोहळा भव्य दिव्य व्हावा असे वाटत होते. त्याची प्रचितीही यावेळी ठिकठिकाणी पहायला मिळाली. मागील सात दिवस अखंड शिवनाम सप्ताहात विविध धार्मीक कार्यक्रम पार पडले. दररोजची आरती आणि महाप्रसादही अखंडपणे चालूच होता. आजच्या पालखी सोहळयात वीरशैव समाजातील सर्व महिला पुरुष व सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन स्वामी व आभार प्रदर्शन अँड गिरीश चौधरी यांनी केले

# पिंपरखेड येथील माध्यमिक विद्यालयामध्ये हिंदी दिवस



वडवणी। प्रतिनिधी

जय तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ एकदरा संचलित पिंपरखेड येथील माध्यमिक विद्यालयामध्ये १४ सप्टेंबर हिंदी राष्ट्रीय दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सविस्तर वृत्तांत असा की,१४ सप्टेंबर हा दिवस भारतात राष्ट्रीय हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो त्यानिमित्त पिंपरखेड येथील माध्यमिक विद्यालयामध्ये हिंदी विभागाच्या वतीने हिंदी भाषेत परिपाठ विद्यार्थ्यांनी घेऊन शिक्षक विद्यार्थी यांनी हिंदीमध्ये हिंदी भाषेचे महत्व पटवून सांगितले तसेच हिंदी दिवसाचे औचित्य साधून विद्यालयातील हिंदी विभागाचे प्रमुख श्री.जंगले सर तसेच हिंदी विषयाचे अध्यापक राऊत सर यांचे शाल व हिंदी भाषेचा ग्रंथ भेट देऊन विद्यालयाचे मुख्याध्यापक लांबुडे सर,श्री.मगर सर यांनी सर्व शिक्षक शिक्षिका यांच्या उपस्थितीमध्ये स्वागत केले जंगले व राऊत सर यांनी हिंदी भाषा दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# धस, आजबे, धोंडेंकडून तयारी; आ.पंकजा मुंडे यांची कृपादृष्टी कोणावर ?

## आष्टीतून उमेदवारी देताना महायुतीसमोर मोठा पेच!

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघात महायुतीकडून उमेदवारी मिळवण्यासाठी तीन बड्या दिग्गजकांमध्ये रस्सीखेच सुरु आहे. माजीमंत्री सुरेश धस यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांना उपमुखमंत्री अजित पवार यांना तयारीला लागण्यास सांगीतले आहे. त्याच प्रमाणे भाजपातीलच माजी आमदार भिमराव धोंडे यांनीही निवडणूकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला असून तेही

निवडणुकीपूर्वी उलथापालथीची शक्यता उमेदवारीसाठी रिंगणात असलेल्या तिघांपैकी एकाला उमेदवारी तर दोघेजण नाराज होणार असल्याची स्थित आष्टी मतदारसंघात निर्माण झाली आहे. सन २०१९ मध्ये एकमेकांचे प्रतिस्पर्धी असलेले हे नेते आता २०२४ मध्ये काय भुमिका घेणार याकडे मतदारसंघाचे लक्ष लागले आहे. दरम्यान आष्टीची जागा ज्यांच्याकडे जाईल. त्याच पक्षाचा महायुतीचा उमेदवार असेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. परंतू महायुतीतीलच मात्तबर असलेल्या इतर दोन प्रबळ दावेदारांची भुमिका काय असणार हेही येणारा काळच ठरवणार आहे.महायुतीच्या तिकीटाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. या तिन बड्या नेत्यांमध्ये महायुतीचा विधानसभा निवडणूकीतील उमेदवार कोण हे ठरवताना महायुतीसमोर चांगलाच पेच



**आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाची जागा ही आजित (दादा)पवार यांच्या कटाला सुटणार आहे अशा चर्चेला उधाण आले आहे. जर असं झालं तर... आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे काही दिग्गज नेते हे बंडाच्या तयारीत असल्याच्या वावड्या देखील उडताना दिसतं आहेत.**

निर्माण होणार आहे. दरम्यान ही जागा कोणत्यापक्षाच्या वाट्याला जाणार यावरच उमेदवार निश्चीत होईल असे चित्र सध्या तरी दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी काळातील विधानसभा निवडणूकीत धस हेच आमदार असतील असे सुचक वक्तव्य केले. याच वक्तव्याचा आधार घेत सुरेश धस यांनी आष्टी, पाटोदा, शिरूर कासार मतदारसंघात झपाट्याने कामाला सुरुवात केली आहे. तर भाजपाचेच असलेले दुसरे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांनी देखील उमेदवारीसाठी दंड थोपटून कामाला सुरवात केली आहे. राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनातून त्यांनी मोठे शक्तीप्रदर्शन करुन निवडणूक लढवण्यावर ठाम असल्याचे संकेत दिले आहेत. तर विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांनी महायुतीत ठरल्याप्रमाणे आष्टी विधानसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेसकडेच राहिल आणि आपणच महायुतीचे उमेदवार राहणार असल्याचा विश्वास त्यांना आहे. सुरेश धस हे सातत्याने गावखेड्यात जावून जनसामान्यांशी संवाद साधत आहेत. तर धोंडे यांनी कुटूंबासह कार्यकर्ते कामाला लावले असून तेही ग्रामीण भागात फिरताना दिसत आहेत. जन सन्मान यात्रेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः आजबे यांना बळ देण्याचे आवाहनच मतदारांना केले आहे.







बीड : येथील शामनगर सोसायटीच्या सार्वजनिक गणेश मंडळाच्या श्रींची आरती दै. लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे व मंजुषा अशोक खाडे यांच्या हस्ते झाली. यावेळी शामनगर सोसायटीतील नागरिक उपस्थित होते.

# पत्रकार दयानंद सोनवणे यांच्यावरील खोटा गुन्हा मागे घेऊन मारहाण करणाऱ्यावर गुन्हा दाखल करावा

## पोलीस अधीक्षकांना मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बातमी छापल्यामुळे पत्रकार दयानंद सोनवणे यांना मारहाण करणाऱ्या अवैध धंदे चालकावर कारवाई करून पत्रकार दयानंद सोनवणे यांच्यावरील खोटा गुन्हा मागे घ्यावा. तसेच सोनवणे यांना मारहाण करणाऱ्यांवर पत्रकार हल्ला विरोधी कायद्यानुसार नुसार गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी बीड पोलीस अधीक्षकांना मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर पोलिसांच्या कार्यक्षेत्रातील अवैध दारू




विक्री, पत्यांचे क्लब, मटका आदी अवैध धंद्याची बातमी दैनिक लोकनायक चे पत्रकार दयानंद सोनवणे यांनी दैनिक लोकनायक च्या दि ९ सप्टेंबर च्या अंकात छापली होती. या अवैध धंद्याची ◀◀ पान ३ वर

## सोमनाथ सारफळे यांना मातृशोक

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड शहरातील श्रीकृष्ण नगर येथील सौ चंद्रकला गणेश सारफळे यांचे सोमवारी ता. १६ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजेच्या दरम्यान अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले, मृत्यूसमयी त्यांचे वय६० वर्षे होते. त्यांच्यावर अंबड येथे हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी



तहशील कार्यालयातील कर्मचारी व पक्षाचे राजकीय पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, नातेवाईक व ग्रामस्थांची उपस्थिती होती. अंबड तलाठी कार्यालयामधील सोमनाथ सारफळे यांच्या आई होत्या तर सोमनाथ त्यांच्या वडील गणेश सारफळे पश्चात तीन मुली एक मुलगा असा त्यांचा परिवार आहे.

# कॉ.सिताराम येचुरी यांना परळीत सर्वपक्षीय श्रद्धांजली

परळी वै । प्रतिनिधी

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस कॉ सिताराम येचुरी यांना परळी येथे सोमवारी (ता.१६) शोकसभेत सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस कॉ सिताराम येचुरी यांचे गुरुवारी (ता.१२) दिल्ली येथील एम्स रुग्णालयात निधन झाले. कॉ सिताराम येचुरी यांना परळी येथील माकप कार्यालयात सर्वपक्षीय नेत्यांनी सोमवारी (ता.१६) सायंकाळी शोकसभेत




श्रद्धांजली वाहिली. माकपचे जेष्ठ नेते कॉ पी एस घाडगे, माकपचे जिल्हा सचिव कॉ अजय बुरांडे, सिटुचे जिल्हाध्यक्ष कॉ बी जी खाडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ बहादुरभाई, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिवनराव देशमुख, मनसेचे शहराध्यक्ष श्रीकांत पाथरकर यांनी शोकभावना व्यक्त करत कॉ सिताराम येचुरी यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी माकपचे शहर सचिव, परमेश्वर गित्ते, शेतकरी संघटनेचे कालीदास आपेट, जेष्ठ नेते उत्तमराव माने, प्रभाकर वाघमोडे, प्रा. अतुल दुबे, कैलास सोळंके, शिवसेनेचे सचिन स्वामी, किसान सभेचे तालुकाध्यक्ष कॉ भगवान बडे, कॉ किरण सावजी, जालिंदर गिरी, सुवर्णा रेवले, अश्वीनी खेत्रे, यांच्यासह विविध पक्ष व संघटनेचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

# बडेवाडीत विद्यूत करंट पाण्यात उतरल्याने शेतकऱ्याची झाली हानी ;लाकडी फळ्यामुळे शेतकऱ्याच्या प्राणावरचे संकट टळले

**मानूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील मानूरजवळ असलेल्या बडेवातील शेतकरी आपल्या बैलगाडीसह रविवारी सकाळी दहाच्या सुमारास शेताकडे जात असतांना ओढ्यातील पाण्यात विद्यूत वाहिनीची तार तुटल्याने करंट उतरला त्यात शेतकरी गाडीतील लाकडी फळ्यामुळे बालंबाल बचावला मात्र त्याच्या बैलजोडीला प्राणाला मुकावे लागेल .




सध्या शेतकामाची धांदल सुरू असुन शेतकरी शेतात काम करण्यासाठी बायकामुलासह राबतो आहे ,रविवारी बडेवाडीचे संजय पाराजी तांदळे हे शेतात जात होते ,जवळून जाणा-या ओढ्याला पाणी होते मात्र विद्यूत वाहिणीची तार तुटून पाण्यात करंट उतरला असेल याची शंका देखील आली नाही मात्र गाडीतच अंगाला थोड्या मुंग्या आल्याची जाणीव होताच अत्यंत सावधगिरीने गाडीतून उडी मारली मात्र बैलगाडी पाण्यात असल्याने बैलाला जोराचा करंट बसला आणि त्यात दोन्हीही खिल्लार बैल मरण पावली.घटनेची माहिती ◀◀ पान ३ वर

## गणेश विसर्जन केंद्रावर नगर परिषदेकडून सर्व व्यवस्था

किल्लेधारूर । प्रतिनिधी

.किल्लेधारूर शहरातील नागरिकांना कळविण्यात येते की दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नगरपरिषद किल्ले धारूर च्या वतीने कासार तलाव येथे गणेश मूर्ती विसर्जन साठीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. येथील सर्व व्यवस्था पुर्ण झाली असुन नगरपरीषद यंत्रणा सज्ज असल्याचे मुख्याधीकारी महेश गायकवाड यानी सांगीतले.

सदर ठिकाणी लाईट ची मोठ्या प्रमाणात व्यवस्था करण्यात आली आहे, तसेच नगरपरिषद व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी पॅन्डोल टाकण्यात आला आहे, व अत्यावश्यक घटना टाळण्यासाठी बोट व अग्निशमन वाहन तैनात करण्यात आले आहे व गणेश विसर्जन करिता न. प. कर्मचारी उपस्थित असून विसर्जन करण्याकरिता नगरपरिषद कार्यालय कडून चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

तरी सर्व भाविक भक्तांना कळविण्यात येते की गणेश मूर्ती सोबत आणलेले पूजा साहित्य जसे की हार फुले नारळ इत्यादी साहित्य पाण्यात न टाकता त्या ठिकाणी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्याकडे द्यावे तसेच विसर्जन ठिकाणी नगरपरिषद प्रशासनात सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी महेश गायकवाड यानी केले आहे.

# जखमी चिमुकलीला आरोग्य मंत्र्यांकडून मदतीचा हात

## अशोक रोमन यांच्या मार्फत दोन लाखांची मदत

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील शिवाजी नगर परिसरातील तीन वर्षीय चिमुकलीच्या शरीरावर गरम पाणी पडले होते. यात सदर चिमुकली ६० टक्के भाजली होती. तिच्यावर बीडच्या एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आराध्या दिनेश ढेंगे असं गंभीर रित्या भाजलेल्या चिमुकलीचे नाव आहे.

दि. २४ ऑगस्ट रोजी सकाळी आराध्या स्नान करण्यासाठी स्नान गृहात गेली होती. यावेळी तिचे पाय घासरले. बाजूलाच बकेट मध्ये गरम पाणी होते. अंगावर उकळते पाणी पडल्याने यात ती गंभीर जखमी झाली होती. आराध्या हीचे वडील रोजंदारी चे काम करतात. आराध्या ६० टक्के भाजल्याने तिच्यावर लाईफ लाईन या खासगी



रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सदर घटना आरोग्यमंत्री तानाजी सांवत यांना समजली. आरोग्य मंत्र्यांनी थेट दोन लक्ष रुपयांची मदत सुपूर्द केली आहे.

आराध्या हीला मदत मिळाली पाहिजे अशा अनेक पोस्ट सोशल ◀◀ पान ३ वर

## बहिरवाडी येथील ३५ वर्षीय इसम बेपत्ता

**मानूर प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील (मानूर) बहिरवाडी येथील ३५ वर्षीय इसम बेपत्ता झाल्याची तक्रार पोलिसांत दाखल करण्यात आली आहे.आबासाहेब दिनकर गायकवाड वय ३५ हे ९ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजता आपल्या नातेवाईकांकडे जातो म्हणून



निघून गेले होते परंतु ते अद्यापपर्यंत घरी परतले नाहीत.माझे नातेवाईक अशोक विठ्ठल बर्डे आणि इतर नातेवाईकांकडे चौकशी केली असता ते मिळून आले नसल्याची तक्रार पत्नी वृंदावनी गायकवाड यांनी पोलिसांत दाखल केली आहे.या प्रकरणी पोलिसांनी बेपत्ता झाल्याची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

# नगरपरिषदेने निदेर्शीत केलेल्या ठिकाणीच गणेश विसर्जन करुया - विधाते

**बीड । प्रतिनिधी**

अवघ्या काही तासांतच आपण गणपती बाप्पांना निरोप देणार आहोत तेंव्हा नगरपरिषदेने निदेर्शीत केलेल्या कंन्कालेश्वर परिसरातील विहीरीतच गणेश मुर्तीचे विसर्जन करुन मुर्तीच्या पावित्र्या बरोबरच नदी कुंड विहीरी तलावच्या पाण्याचं प्रदुषण थांबवावे.

यावर्षीही आपल्या कडे पाहिजे तसा पाऊस झालाच नाही परिणामी काही अपवाद वगळता नदी- नाले-ओढे खळखळून वाहीले नाही तर विहीरी- कुंड तुडुंब भरले नाहीत. आजही आपण



पीपीच्या लहान मोठ्या मुर्तीची प्रतिष्ठापना करतोत. परिणामी पीओपी पाण्यात सहज विरघळत नाहीत त्यामुळे गणेश मुर्तींचे अवशेष कितेक दिवस नदी ओढ्यात काठी विखुरलेले पाहायला मिळतात. तेंव्हा आपणच आपल्या हाताने मनोभावे श्रध्देने प्रतिष्ठापीत केलेल्या बाप्पांचे हे रूप मनाला याताना देणारे आहे. तेंव्हा आपल्या घरातील छोट्या मुर्ती घरीच हौदात बकीटात विसर्जीत कराव्यात साडू मातीच्या असतील तर ती माती मुर्तीकाराला मोफत देऊन टाकावी जेने करुन पुढील वर्षी पुन्हा नव्या रूपात बाप्पा आपल्या भेटीला येईल आणि मुर्तीकाराला मदत होईल. जर मुर्ती पीओपी ची असेल तर ती मुर्ती जवळच्या मुर्ती विक्रेत्याला भेट म्हणून द्यावी जेणेकरु ◀◀ पान ३ वर

# तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये गुरुकुल इंग्लिश स्कूलने दणदणीत विजय मिळवला

**बीड । प्रतिनिधी**

दि. १६.०९.२०२४ रोजी शालेय क्रिकेटच्या तालुकास्तरीय स्पर्धा शिदोड येथील डी. एस. के.क्रिकेट ग्राउंड वर घेण्यात आल्या या स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये एकूण १७ शाळांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये खेळत असताना गुरुकुल इंग्लिश स्कूल ने प्रथम मॅच मध्ये शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल, ◀◀ पान ३ वर



**फायनल मध्ये कृष्णा गायकवाड आणि अरशान पठाण चमकले**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# 'वंदे भारत ट्रेन'च्या माध्यमातून विकसित देशातील प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा भारतीयांना उपलब्ध-उपमुख्यमंत्री फडणवीस

**पुणे । प्रतिनिधी**

वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेन ही भारताची शान असून विकसित देशातील प्रवाशांना ज्या प्रकारच्या प्रवासाच्या सुविधा मिळतात त्या सर्व सुविधा भारतीयांना या ट्रेनमधून मिळत आहेत, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यम प्रतिनिधींशी बोलताना म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणाली पद्धतीने हिरवा झेंडा दाखवून पुणे- हुबळी वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पुणे रेल्वे स्थानक येथे आयोजित कार्यक्रमानंतर ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार सुनील कांबळे, भीमराव तापकीर, माधुरी मिसाळ, विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे, पुणे मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आदी उपस्थित होते.

श्री. फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राला पुणे- हुबळी, पुणे- कोल्हापूर आणि नागपूर सिकंदराबाद या तीन वंदे भारत रेल्वेची भेट दिली आहे. यामुळे महाराष्ट्रातील प्रवाशांचा प्रवास गतिमान आणि सुखकर होणार आहे. ही भारताने स्वत: आपल्या देशात तयार केलेली आंतरराष्ट्रीय दर्जाची ट्रेन आहे, असेही ते म्हणाले.






तत्पूर्वी केंद्रीय राज्यमंत्री श्री. मोहोळ म्हणाले, देशामध्ये १६ वंदे भारत ट्रेनचे लोकार्पण होत असताना महाराष्ट्रात तीन आणि पुण्यासाठी दोन ट्रेन सुरू होत असल्याची पुणे शहरासाठी आनंदाची बाब आहे. गेल्या दहा वर्षात रेल्वेच्या विकासासाठी २३ लाख ६४ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यामध्ये नवीन रेल्वे स्थानकांची कामे, अमृत योजना, आदर्श रेल्वे स्थानक आदी अनेक कामे सुरू असून जवळपास १ हजार ६४ स्थानकांचा कायापालट त्यांच्या नवीनीकरणाच्या कामातून होत आहे, असेही ते म्हणाले. श्री. मोहोळ यांनी पुढे सांगितले, पुणे- लोणावळा तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेचे कामही लवकरच सुरू होईल. त्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार प्रत्येकी २ हजार ५०० कोटी रुपये देणार असून त्यामुळे पुणे-मुंबई प्रवासातील वेळ तर कमी करण्यासाठी उपयुक्त होणार आहे. पुणे ते दिल्ली स्लीपर वंदे भारत ट्रेनबाबतही केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे मागणी करण्यात आली आहे. पुणे रेल्वे स्थानकाची जागा अपुरी पडत असल्यामुळे पुढील काळात ऊरुळी कांचन येथे भव्य हार्बर टर्मिनल उभे करण्याबाबतचा आराखडा करण्यात आला असून लवकरच याबाबत कार्यवाही सुरू होईल, असेही श्री. मोहोळ म्हणाले.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, ही रेल्वेच्या महाराष्ट्राच्या इतिहासात ऐतिहासिक घटना आहे. पुणे- कोल्हापूर आणि पुणे- हुबळी वंदे भारत ट्रेन मुळे पश्चिम महाराष्ट्रातील पुणे ते कोल्हापूर पट्ट्याला मोठा फायदा होणार आहे. या पट्ट्यात प्रचंड सहकारी चळवळ, उद्योग, शैक्षणिक संस्था असल्यामुळे एकाच दिवसात कोल्हापूरहून पुणे आणि पुण्याहून कोल्हापूर असे कामकाज करुन परत येणे शक्य होणार आहे. चांगला वेग, दिसायला आकर्षक, प्रवाशांना प्रवासाचा आनंद देणारी आणि उच्च दर्जाचे खाद्यपदार्थ असलेली ही रेल्वे आहे, असेही त्यांनी सांगितले.


नुकतीच पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलवरुन विमानसेवा सुरू झाली आहे. आता लवकरच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मेट्रो सेवेच्या पुढील टप्प्याचा शुभारंभ होत आहे. हे पाहता पुणे शहरात दळणवळण आणि प्रवासासाठी चांगल्या सेवा निर्माण होत आहेत, असेही मंत्री श्री. पाटील म्हणाले. यावेळी खासदार श्रीमती कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे यांनी प्रास्ताविक केले.

# मालकासाठी श्वान भिडले बिबट्याशी ! वाचवले प्राण

आंबेगाव । प्रतिनिधी

लाखनगाव (ता. आंबेगाव) येथील दळेवस्तीत बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी झाला. ही घटना रविवारी (दि. १५) पहाटे चार वाजण्याच्या दरम्यान घडली. या हल्ल्याप्रसंगी पाळीव गुड्डी नावाच्या श्वानाने बिबट्याला प्रतिकार केल्याने माझे प्राण वाचल्याचे या शेतकर्याने सांगितले.

हनुमंत नारायण टाके (वय ४२) असे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या शेतकर्याचे नाव आहे. त्यांच्यावर मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत अधिक माहिती अशी, शेतकरी टाके हे पहाटे चार वाजण्याच्या सुमारास लघुशंकेसाठी घराबाहेर आले होते. त्यावेळी गोठ्यात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. बिबट्याने त्यांची मान पकडण्याचा प्रयत्न करत त्यांना खाली पाडले. त्यावेळी मानेला पकडू नये म्हणून टाके यांनी



एक हात बिबट्याच्या तोंडात देत त्याला प्रतिकार सुरू केला. त्यांच्यात झटापट सुरू झाली. त्यावेळी त्यांच्या पाळीव गुड्डी नावाच्या श्वानाने जोरात भुंकत बिबट्याला पाठीमागे ओढण्याचा प्रयत्न केला. टाके व बिबट्याच्या झटापटीचा आवाज ऐकून त्यांची पत्नी आशा टाके घराबाहेर आल्या. समोरचे दृश्य पाहून त्या घाबरल्या. मात्र, त्यांनी जोरजोरात आरडाओरडा तसेच काठीचा आवाज केल्याने बिबट्याने पळ काढला.

## परिसरात तीन बिबट्यांचा वावर

वन विभागाच्या अधिकार्यांनी जखमी टाके यांची उपजिल्हा रुग्णालयात भेट घेत घटनेची माहिती घेतली. या परिसरात तीन बिबटे समूहाने फिरत असून अनेकदा बिबट्याचे दर्शन झाले आहे. वन विभागाने या ठिकाणी पिंजरा लावावा व बिबट्यांना जेरबंद करावे, अशी मागणी स्थानिक शेतकर्यांनी केली आहे.

मात्र, या हल्ल्यात टाके यांच्या हाताला बिबट्याचे दात व नख लागले. बिबट्याने त्यांना पायाला धरून ओढण्याचा प्रयत्न केल्याने पायाला देखील जखमा झाल्या आहेत. या हल्ल्यात त्यांच्या पाळलेल्या गुड्डीने जोरदार प्रतिकार केल्याने जीव वाचला असल्याचे टाके यांनी सांगितले.

# पुणे-नाशिक औद्योगिक राष्ट्रीय महामार्ग होणार रद्द - सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील

**आंबेगाव । प्रतिनिधी**

'नियोजित पुणे -नाशिक औद्योगिक राष्ट्रीय महामार्गाला जुन्नर, आंबेगाव, शिरूर व संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांचा प्रखर विरोध लक्षात घेता हा महामार्ग रद्द होण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची फाईलवर स्वाक्षरी झाली आहे.येत्या चार-पाच दिवसात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदेयांची स्वाक्षरी झाल्यानंतर राज्य शासन रस्ता रद्द झाल्याची अधिसूचना काढणार आहे'. अशी माहिती राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली.

मंचर (ता आंबेगाव) येथे रविवारी(ता.१५) रात्री पुणे-नाशिक औद्योगिक उद्योग महामार्ग संघर्ष समितीच्या वतीने नियोजित महामार्ग रद्द व्हावा याबाबत आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने वळसे पाटील यांच्यावर बरोबर चर्चा केली. शिष्टमंडळाचे नेतृत्व शेतकरी संघर्ष समितीचे प्रमुख बाळासाहेब औटी, समन्वय वल्लभ शेळके,



जी. के. औटी, एम.डी घंगाळे, मोहन नायकोडी, प्रतीक जावळे, काठापूरचे सरपंच अशोक करंडे, माजी उपसरपंच विशाल करंडे, कान्हू करंडे, दिलीप जाधव, सुरेश बोरचटे, निवृत्ती करंडे, हेमंत करंडे, अविनाश आठवले, गोविंद हाडवळे आदी शेतकरी होते. यावेळी शेतकर्यांच्या भावना तीव्र होत्या. 'सध्या पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग अस्तित्वात आहे नवीन महामार्गाची आवश्यकता नाही. सध्या अस्तित्वात असलेल्या महामार्गाचे विस्तारीकरण करण्यात यावे. पण नव्याने समांतर रस्ता करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे २०१३ च्या केंद्र सरकारच्या भूसंपादन कायद्याची जशीच्या तशी अंमलबजावणी करावी.राज्य सरकारने याबाबत तोडगा न काढल्यास संघर्ष समितीच्या वतीने बाधित गावांमध्ये तहसीलदार कचेरी,आमदार, खासदार मंत्री यांच्या कार्यालय व घरापुढे शांतता मार्गाने आंदोलन उपोषण व मुंबई मंत्रालय येथे शेतकऱ्यांचा मोर्चा काढून आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.' असा इशारा बाळासाहेब औटी यांनी दिला.

# रसिकांच्या उस्फूर्त प्रतिसादात रंगली ना. धों. महानोर यांच्या गीतांची मैफल

**पिंपळे सौदागर । प्रतिनिधी**

दि. - शेत शिवराचे नातं सांगणारे दूरच्या रानात केळीच्या बनात , श्रृंगार रसाची उधळण करणारे चांद केवड्याची रात , वाडी - वस्तीवरील जीवनाचे चित्र रेखाटणारे आम्ही ठाकरं ठाकरं या एकापेक्षा एक सरस कविता आणि गीतांची मैफल नभं उतरु आलं उपस्थित रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात रंगली. मराठीतील ख्यातनाम कवी पद्मश्री ना. धों. महानोर यांच्या जन्मदिनानिमित्त भाजपा सांस्कृतिक प्रकोष्ट आणि पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सदर मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. रविवार दि. १५ रोजी सांगवी येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहात ही मैफल संपन्न झाली. प्रारंभी ना. धों. महानोर यांच्या कन्या सरला शिंदे, हभप जांभुळकर महाराज, विजय भिसे, उन्नती सोशल फाऊंडेशनचे संचालक डॉ. कुंदाताई भिसे, संजय भिसे यांच्याहस्ते दिपप्रज्वलन आणि ना. धों. च्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर रसिकांच्या प्रतिसादात रंगत गेलेल्या या मैफलीत सतिश इंगळे, धनंजय पवार, मनिषा निश्चल आणि भारती न्यायाधीश या गायक कलावंतांनी शेत - शिवाराची निगडीत बहारदार गाणी सादर करुन रसिकांची मने जिंकली . दोन ते अडीच तास उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या मैफलीचे सुत्रसंचलन संतोष घुले यांनी केले. मिहिर भडकमकर यांच्या संगीत संयोजनाने नटलेल्या या मैफलीत गायकांना अमान सय्यद ( सिंथ ), विक्रम भट ( तबला ) , पद्माकर गुजर ( साईड रिदम ) पिनाक न्यायाधीश ( गिटार ), अभिजित भदे ( क्टोपॅड ) या वादक कलावंतांनी साथसंगत केली. पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशनचे संस्थापक विजय भिसे यांनी ना. धों. महानोरांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या दृष्टीकोनातून हा उपक्रम राबविला असल्याचे आपल्या प्रास्ताविकात नमुद केले.

# युवकाचे अपहरण करून ४ लाख ७० हजार लुटले

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे- नगर महामार्गावर सणसवाडी (ता. शिरूर) येथे एकाला कारमध्ये बसवून अपहरण करून व त्याचे महिलेसोबत फोटो काढून व्हायरल करण्याची धमकी देत मारहाण करून सोन्याचे दागिने, रोख रक्कम तसेच नातेवाईकांकडून ऑनलाइन पद्धतीने पैसे मागवून घेऊन ४ लाख ७० हजार रुपयांची लूट करण्यात आली. शिक्रापूर पोलिसांनी याप्रकरणी एका महिलेसह चौघांना अटक केली आहे.

राहुल सुखदेव गायकवाड (वय ३४, रा. कुकडी, ता. पारनेर, जि. अहमदनगर), विकास प्रकाश थिटे (वय २६, रा. चौधरी वस्ती पाबळ, ता. शिरूर), अर्चना अविनाश पठारे (वय ३४, रा. जवळा, ता. पारनेर, जि. अहमदनगर) आणि समिर प्रकाश शेलार (वय २१, रा. निमोणे, ता. शिरूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. याबाबत संदीप जिजाबा ताठे (रा. निमोणे, ता. शिरूर) यांनी याबाबत शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निमोणे (ता. शिरूर) येथील संदीप ताठे यांना ८ सप्टेंबर रोजी अर्चना पठारे या महिलेने फोन करून तुम्ही पैशांची मदत करू शकता का असे विचारले. त्यावेळी ताठे यांनी माझ्याकडे पैसे नाहीत, असे सांगत फोन कट केला. त्यानंतर दोन दिवसांनी महिलेने फोन करून माझे वाघोलीत घर आहे, ते घ्या व मला पाच लाख रुपये द्या असे म्हणून वारंवार फोन करण्यास सुरुवात केली. त्यामुळे ताठे महिलेचा फोन टाळू लागले. त्यानंतर बुधवारी



(दि. ११) ताठे पुण्याला जात असताना अर्चना यांनी फोन करून सणसवाडी येथील एल अँड टी फाट्याजवळ असल्याचे सांगून ताठे यांना बोलावले. या वेळी ताठे कारमधून जात असताना अर्चना यांच्यासह राहुल गायकवाड, विकास थिटे हे कारजवळ आले. त्यांनी संदीप ताठे यांना बाहेर बोलावून दुसर्या कारमध्ये बसवून वाघोली येथील एका ठिकाणी घेऊन जाऊन अर्चना पठारेसोबत संदीप ताठे यांचे फोटो काढून घेत फोटो व्हायरल करण्याची तसेच त्याच्यावर गुन्हा दाखल करून गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत मारहाण केली.

या वेळी संदीप ताठे यांच्या गळ्यातील सोन्याची चेन, अंगठ्या तसेच रोख रक्कम काढून घेतली. त्यानंतर संदीप यांच्या क्रेडिट कार्डचा पिन घेऊन त्यातून पैसे काढले, तसेच संदीप यांच्या नातेवाइकांना फोन करून ऑनलाइन पैसे मागवून घेऊन संदीप यांची तब्बल ४ लाख ७० हजार रुपयांची लूट केली. या सर्व प्रकारानंतर संदीप ताठे याला पुन्हा सणसवाडी येथे आणून सोडून दिले व पोलिसांत गेला तर जिवे मारून टाकू अशी धमकी दिली. दरम्यान या गुन्ह्याचा तपास करताना पोलिस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे यांनी तीनही आरोपींना अटक केली; मात्र याबाबत तपास करत असताना निमोणे गावातील समीर शेलार यानेच आपल्या गावातील संदीप ताठे याच्याकडे पैसे व सोने असल्याचे सांगून लुटण्यास सांगितल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांनी समीर शेलार यालादेखील अटक केली. या सर्वांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने सर्वांना चार दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या घटनेचा तपास पोलिस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे हे करीत आहेत.

# जिल्ह्यात ईव्हीएम बाबत जनजागृतीसाठी विशेष मोहिमेचे आयोजन



**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांसाठी ईव्हीएम बाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून या मोहिमेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

ही मोहीम १० सप्टेंबरपासून राबविण्यात येत असून या मोहिमेंतर्गत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) असलेली व्हॅन जिल्ह्यातील विविध मतदान केंद्र, शाळा, महाविद्यालय, आठवडी बाजाराच्या ठिकाणी फिरविण्यात येत असून नागरिकांना या व्हॅनच्या माध्यमातून ईव्हीएम मशीन बाबत माहिती देण्यात येत आहे.

या ईव्हीएम व्हॅन मध्ये बहुमाध्यम वैशिष्ट्ये (मल्टीमीडिया फीचर्स) असून मतदान करताना ईव्हीएम चा वापर कसा करावा याबाबत चित्रफीत दाखवण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व २१ मतदारसंघांमध्ये या व्हॅन द्वारे ईव्हीएम विषयी जनजागृती करण्यात येत आहे. गावा-गावात ईव्हीएम व्हॅन च्या माध्यमातून प्रात्यक्षिकाद्वारे नागरिकांना माहिती देण्यात येत आहे. नागरिकांच्या मनातील ईव्हीएम संदर्भातील गैरसमज दूर होण्यासाठी या मोहिमेचा लाभ होत आहे. या जनजागृती मोहिमेला गावागावात उत्तम प्रतिसाद मिळत असून नागरिक ईव्हीएम संदर्भात माहिती जाणून घेत आहेत, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती मीनल कळसकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# पुण्यातील वनराज आंदेकर प्रकरण;आरोपींवर मोक्कांतर्गत कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याची शैक्षणिक पंढरी असलेल्या पुणे शहरातील गुन्हेगारी गेल्या काही महिन्यांपासून चांगलीच चव्हाट्यावर आली आहे. ड्रग्ज, हत्या, गोळीबाराच्या घटनांनी पुणे शहर हादरुन गेलं आहे. त्यामुळे, पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही दिवसांपूर्वी पुण्यात माजी नगरसेवकाचा भररस्त्यात खून करण्यात आला होता. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाल्यानंतर राज्यात खळबळ उडाली. तसेच, पुण्यातील गुन्हेगारीचा मुद्दा नव्याचे चर्चेत आला. माजी नगरसेवक वनराज आंदेकर खूनप्रकरणात पोलिसांनी कारवाई करत २२ आरोपींना अटक केली. यातील काही आरोपींना चक्क ताम्हिणी घाटातून बेड्या ठोकल्या होत्या. आता, वनराज आंदेकर प्रकरणातील सर्वच आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

वनराज आंदेकर खून प्रकरणातील सर्व आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली असून एकूण २२ आरोपींवर पुणे पोलिसांकडून मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज सूर्यकांत आंदेकर (वय ४०) यांच्या खूनप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या आरोपींवर महाराष्ट्र संघटित



गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे, या आरोपींच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे.

पुण्यात सहा ते सात टू व्हीलरवरुन तेरा ते चौदा जण आले आणि त्यांनी थेट वनराज आंदेकर यांच्यावर हल्ला केला. त्यांच्यावर गोळीबार करत कोयत्यानं वार केले. हल्ला करण्यापूर्वी आरोपींनी अगोदर चौकातील लाईटही घालवली होती. शिवाय आंदेकर एकटेच असल्याचा अंदाज घेत आरोपींनी आंदेकर यांच्यावर हल्ला केला. घरात कार्यक्रम असल्यामुळे आंदेकर यांच्यासोबत इतर सहकारी नव्हते. नेमकी हीच संधी साधून दुचाकीवरून आलेल्या तेरा ते चौदा जणांनी आधी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यांच्यावर कोयत्यानं वारही केले. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या आंदेकर यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारांपुर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं, हल्लेखोर घटनास्थळावरुन फरार झाले. त्यानंतर घटनास्थळी एकच गर्दी झाली. सध्या हे प्रकरण गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आलं असून पोलिसांकडून कसून तपास सुरू आहे.

**मोक्का कधी लावला जातो?**

गुन्हेगारी पार्श्वभूमी तयार करणाऱ्या आरोपीला पोलिसांकडून प्रथम समज दिली जाते. पण या संधीचा आरोपीने गैरफायदा घेतला तर तो पोलिसांच्या रेकॉर्डवर येतो. आरोपीवर अटकेची तसंच नंतर तडीपारीचीही कारवाई होते. अशा आरोपींना अटक केली जाते. तरीसुद्धा आरोपीमध्ये सुधारणा न झाल्यास त्यावर तडीपारीची कारवाई केली जाते. यानंतरही आरोपीमध्ये जर सुधारणा होत नसेल तर, अशावेळी पोलीसांना मोक्का अंतर्गत कारावाई करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

**मोक्का लागल्यावर शिक्षा काय मिळते ?**

मोक्का लागल्यास आरोपीला अटकपूर्व जामीन मिळवता येत नाही. भारतीय दंड विदान संहीतेच्या लावलेल्या कलमांखाली जेवढी शिक्षा असेल तीच सिक्षा मोक्काच्या कलम ३ (१) नुसार देता येईल. ही सिक्षा किमान ५ वर्षे ते जन्मठेपेपर्यंत राहते. त्याचबरोबर किमान दंड हा पाच लाखांपर्यंतचा असतो. तसंच दोषींची मालमत्ता जप्त करण्याचीही तरतूद या कायद्यात आहे. संघटीत गुन्हेगारी करुन जर आर्थिक फायदा घेतला जात असेल कींवा टोळी तयार करुन जर गुन्हेगरी करत असाल तर त्या संदर्भात मोक्काची तरतूद केली आहे.

# पाळीव प्राण्यांना मारून अवयवांची तस्करी


मुळशी : गुंगीचे औषध देत पाळीव प्राण्यांना मारून अवयवांची तस्करी केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार मुळशी धरण भागातील नांदगाव, देवघर परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी धरण भागातील नागरिकांनी पौड पोलिस ठाण्यात फिर्यादी नोंदवल्या आहेत. समाजकंटकांना अटक करून हा प्रकार रोखण्याची मागणी केली आहे.

मागील काही दिवसांपासून आंबवणे ग्रामपंचायत हद्दीत समाजकंटकांद्वारे गाय व बैलांना गुंगीचे औषध देत ठार मारले जात आहे. त्यानंतर या मृत जनावरांचे अवयव कापून नेले जात आहेत. गेल्या काही दिवसात अशा प्रकारच्या ७ ते ८ घटना घडल्या आहेत, त्यामुळे गावात भीतीचे वातावरण पसरलेले आहे.

दि. ७ सप्टेंबर रोजी देखील अशीच एक घटना नांदगाव येथे घडली. अनंता वाळंज यांच्या बैलाला मारून त्याचे अवयव काढून नेण्यात आले आहेत. याबाबतचे पुरावे देखील पौड पोलिसांना देण्यात आले आहेत. ही बाब अतिशय गंभीर असून याबाबतचा तपास लवकरात लवकर करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी पोलिसांना केली. पौड पोलिस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांनी संबंधित समाजकंटकांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. ग्रामस्थांनीही संशयितांवर लक्ष ठेवावे व पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन केले आहे. पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य अमित कंधारे, माजी सभापती कोमल वाशिवले, राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रवीण धनवे, मिलिंद कॅनरी फार्मचे दादा वाळंज, कुंभेरीचे सरपंच ज्ञानेश्वर दाभाडे, उपसरपंच नवनाथ दाभाडे, अमित आखाडे, रवी हुंडारे, निलेश मेंगडे, अॅड. आबासाहेब मरवडी आदी या वेळी उपस्थित होते.

## 'ध्वनी प्रदूषण नियमाचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर करण्यात येणार कारवाई'

पुणे - गणेश विसर्जन मिरवणुकीत साउंड सिस्टीमच्या भिंती उभारून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या मंडळांवर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी पोलिसांकडून ध्वनी पातळी तपासण्यासाठी



(नॉईज लेवल मीटर) १२६ पथके तैनात करण्यात आल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.गणेश विसर्जन मिरवणुकीत काही मंडळांकडून साउंड सिस्टीमच्या भिंती उभारल्या जातात. गतवर्षी साउंड सिस्टिमच्या मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांसह नागरिकांना त्रास झाल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे यंदाच्या विसर्जन मिरवणुकीत कोणत्याही मंडळाने ध्वनी पातळीबाबत देण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन करू नये. ज्या मंडळांकडून नियमांचे उल्लंघन करण्यात येईल, त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी १२६ पथके तयार करण्यात आली आहेत. याची सर्व मंडळांनी नोंद घ्यावी, अशी माहिती शहर पोलिस दलाकडून देण्यात आली आहे.